रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक ३२२
www.ramprahar.com
# राम प्रहर
सोमवार, ९ जून २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## रत्नागिरीत गॅस टँकर-मिनीबसची धडक; प्रवासी जखमी



**रत्नागिरी :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर रत्नागिरीमधील निवळी घाटात रविवारी (दि. ८) सकाळी एलपीजी गॅस टँकर आणि प्रवासी मिनीबसमध्ये समोरासमोर धडक होऊन मोठा अपघात घडला. टँकरच्या जोरदार धडकेनंतर मिनीबस दरीत कोसळली, तर टँकरमधून गॅस लीक होऊन आजूबाजूच्या परिसरात आग लागली. मिनीबसमधील सुमारे ३० प्रवासी जखमी झाले असून जखमींना रत्नागिरी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या वेळी टँकरमधून गॅस लिकेज झाल्यामुळे आगीचा भडका उडाला. या आगीत महामार्गालगतचे घर, आंब्याची बाग, चारचाकी, दुचाकी, रिक्षा यांचे नुकसान झाले असून जनावरांनादेखील आगीचा फटका बसल्याची माहिती आहे. अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती.

### अंतरंग

'जनतेने नाकारलेल्या राहुल गांधींनी आत्मपरीक्षण करावे'/२
खोपोलीमध्ये दरड कोसळण्याची भीती/५
कर्जतमध्ये रायगड जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धा/८

# प्राथमिक आरोग्यसेवांचे जाळे निर्माण करणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन; रुग्णालयाचे उद्घाटन

**पुणे : प्रतिनिधी**

प्राथमिक आरोग्यावर भर दिल्यास विशेषोपचार असलेल्या संदर्भ सेवांवरील ताण कमी होतो. त्यामुळे संपूर्ण राज्यात प्राथमिक आरोग्यसेवांचे जाळे निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि. ८) केले. त्या दृष्टीने राज्यातील आरोग्यसेवेची पुनर्रचना करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असल्याचे त्यांनी या वेळी नमूद केले.



मावळ तालुक्यातील आंबी-तरंगवाडी येथे पुष्पलता डी.वाय. पाटील रुग्णालयाच्या उद्घाटनावेळी मुख्यमंत्री बोलत होते. या कार्यक्रमास खासदार श्रीरंग बारणे, आमदार सुनील शेळके, डी. वाय. पाटील विद्यापीठ नवी मुंबईचे अध्यक्ष तथा कुलपती डॉ. विजय पाटील, डी.वाय. पाटील विद्यापीठ कोल्हापूरचे कुलपती संजय पाटील, डी.वाय. पाटील विद्यापीठ नवी मुंबईच्या उपाध्यक्ष तथा उपकुलपती डॉ. शिवानी पाटील, माजी राज्यमंत्री संजय उर्फ बाळा भेगडे, उद्योजक रामदास काकडे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, की, राज्यात प्राथमिक आरोग्यावर लक्ष केंद्रित करण्यासह द्वितीयस्तरीय आरोग्य सेवाही बळकट करण्यात येणार आहेत. विशेषोपचारासाठी शासकीय रुग्णालये, विद्यापीठांची आणि खासगी रुग्णालये आहेत. प्रास्ताविकात कुलपती डॉ.पाटील यांनी रुग्णालयाची माहिती दिली.

# आपल्या संस्कृतीचे जतन केले पाहिजे -लोकनेते रामशेठ ठाकूर



**उरण : वार्ताहर**

उरण शहर आणि परिसरात वाढत असलेल्या औद्योगिकीकरणामुळे गावांमध्ये बदल होत असले तरी आपण आपल्या संस्कृतीचे जतन केले पाहिजे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रविवारी (दि. ८) उरण येथे केले. ते ज्येष्ठ नागरिक मंडळाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नुकतेच अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. या निमित्ताने रविवारी उरण मुळेखंड येथील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रात मुळेखंड, तेलीपाडा, कोळीवाडा, कुंभारवाडा व परिसर ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या वतीने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यांनी भविष्यात ज्येष्ठ नागरिक मंडळाला कोणत्याही प्रकारची मदत लागल्यास आपण तयार असल्याचे आश्वासन दिले.

लोकनेते रामशेठ ठाकूर पुढे म्हणाले की, उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व्यक्तींच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली, तर त्यांना प्रेरणा मिळते. पुढील काळात अधिक चांगले काम करण्याची त्यांच्यामध्ये उमेद निर्माण होते. येथील ज्येष्ठ नागरिक मंडळ चांगले काम करीत असून ते कौतुकास पात्र आहेत, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास भाजपचे ज्येष्ठ नेते रवी भोईर, जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत घरत, माजी जि.प.सदस्य जीवन गावंड, चाणजे ग्रामपंचायतीचे सरपंच अजय म्हात्रे, कामगार नेते सुधीर घरत, चाणजे विभाग अध्यक्ष जितेंद्र घरत, सदस्य उज्वला म्हात्रे, मुळेखंड गाव अध्यक्ष हितेश म्हात्रे, संजय होळकर यांच्यासह मुळेखंड, तेलीपाडा, कोळीवाडा, कुंभारवाडा व परिसर ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश म्हात्रे, कार्याध्यक्ष अनंत पाटील, सचिव परशुराम पाटील, उपाध्यक्ष अंकुश म्हात्रे, खजिनदार ईश्वर म्हात्रे, सहसचिव सुभाष गुरव, सहखजिनदार गोपीनाथ मंडेलकर, उरण तालुका भाजप उपाध्यक्ष मुकुंद गावंड, सरचिटणीस सुनील पाटील, ज्येष्ठ नागरिक मंडळ सदस्य कमलाकर म्हात्रे, रामचंद्र म्हात्रे, हरिश्चंद्र म्हात्रे, रमेश म्हात्रे, पंढरीनाथ मांडेलकर, नामदेव पाटील, सरिता म्हात्रे, नथुराम म्हात्रे, केशव म्हात्रे यांच्यासह ग्रामस्थ, नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी दहावी, बारावी तसेच वैद्यकीय क्षेत्रात प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आला, तर मुळेखंड गावची कन्या डॉ. मानसी अनिल पाटील ही बीएएमएसचे पदवी शिक्षण पूर्ण करून डॉक्टर झाल्याबद्दल तिचा विशेष सन्मान करण्यात आला. याच कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिकांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले आणि वृक्षारोपणही करण्यात आले.

# कळंबोलीत दाखले वाटप शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून कौतुक

**कळंबोली : बातमीदार**


माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शिवशंभो सामाजिक विकास मंडळ आणि पनवेल तालुका महसूल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दाखले वाटप शिबिराचे आयोजन रविवारी (दि. ८) कळंबोली येथे करण्यात आले होते. या शिबिरास नागरिक, विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर यांनी येथील शिबिरास भेट देऊन या उपक्रमाचे कौतुक केले.

भाजप कळंबोली शहर अध्यक्ष आणि पनवेल महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती अमर पाटील यांच्या संयोजनातून कळंबोली ज्ञानमंदिर शाळेत हे शिबिर झाले. विद्यार्थी, नागरिकांना विविध दाखल्यांची आवश्यकता भासते. त्यांना हे दाखले मिळविण्यासाठी तहसील कचेरीत अनेक वेळा खेटे मारावे लागतात. त्यांचा हा त्रास वाचविण्यासाठी हे शिबिर घेण्यात आले, ज्याचे उद्घाटन पाटील यांच्या हस्ते झाले. **(पान २ वर..)**



## आज तिथीप्रमाणे शिवराज्याभिषेक

**महाड : प्रतिनिधी**



हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा नुकताच तारखेप्रमाणे राज्याभिषेक सोहळा झाला, तर सोमवारी (दि. ९) तिथीनुसार सोहळा शिवप्रेमींच्या उपस्थितीत होणार आहे.

या सोहळ्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मंत्री उदय सामंत, आदिती तटकरे व इतर मंत्री, आमदार उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे नियोजन मंत्री भरत गोगावले यांच्या मार्गदर्शनाखाली कोकण कडा मित्रमंडळ व श्री शिवराज्याभिषेक दिनोत्सव समिती करीत आहे.

## निवडक

### आसाममध्ये पुरामुळे २३ जणांचा मृत्यू; ३.३७ लाख लोक बाधित

**गुवाहाटी :** आसाममधील पूरस्थितीत थोडी सुधारणा झाली असली तरी राज्यातील १२ जिल्ह्यांमधील सुमारे ३.३७ लाख नागरिक अजूनही पुराच्या तडाख्यात आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी रविवारी (दि. ८) दिली. सरकारी बुलेटिननुसार आतापर्यंत पुर आणि भूस्खलनामुळे एकूण २३ जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये सहा जण भूस्खलनात मरण पावले आहेत. ब्रह्मपुत्रा नदीसह प्रमुख नद्यांचा पूर सध्या ओसरत असला तरी काही नद्या अजूनही धोक्याच्या पातळीवर आहेत.


### आषाढी यात्रा : भाविकांसाठी २७ जूनपासून २४ तास दर्शन

**पंढरपूर :** आषाढी यात्रेच्या अनुषंगाने विठ्ठल रखुमाईचे २७ जूनपासून २४ तास दर्शन सुरू राहणार आहे तसेच गेली अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले टोकन दर्शन व्यवस्थेची चाचणी १५ जून रोजी घेण्यात येणार आहे. यातील काही सुधारणा व आवश्यक तो बदल करून सुरू ठेवणार असल्याची माहिती विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष हभप गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. दरम्यान, आषाढी यात्रेचा मुख्य दिवस म्हणजे एकादशी ६ जुलै रोजी आहे.

# भुशी डॅममध्ये बुडून दोन तरुणांचा मृत्यू

**खालापूर : प्रतिनिधी**

वर्षा पर्यटनासाठी आलेल्या पुणे येथील ग्रुपमधील दोन तरुणांचा लोणावळा येथील भुशी धरणात बुडून मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि. ८) घडली. मोहम्मद अशरफ अली जमाल (वय २२) आणि साहिल अली शेख (वय १९) अशी मृत तरुणांची नावे असून ते मुळचे उत्तर प्रदेशचे आहेत.



पुणे येथील १० तरुण लोणावळा फिरण्यासाठी आले होते. फिरून झाल्यावर प्रसिद्ध अशा भुशी धरणात पोहण्याचा मोह न आवरल्याने एकाने पाण्यात उडी मारली, मात्र तो बुडू लागला. त्यामुळे त्याला वाचवण्यासाठी दुसरा गेला असता तोही बुडाला.

लोणावळा येथील सामाजिक कार्यकर्ते सुनील गायकवाड व शिवदुर्ग रेस्क्यू टीमने बुडालेल्या दोन्ही तरुणांचे मृतदेह बाहेर काढून रुग्णालयात नेले. या वेळी पोलीसदेखील उपस्थित होते.

## शेततळ्यात बुडून दोन भावंडांचा मृत्यू

**पैठण :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आगलावे गेवराई येथे रविवारी (दि.८) दुपारी दोन सख्खे चुलत भाऊ शेततळ्यात पोहण्यासाठी गेले असता त्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. सतीश एकनाथ आगळे (वय १६) व गौरव शिवाजी आगळे (वय १८, दोघे रा. गेवराई बु. ता. पैठण) अशी त्यांची नावे आहेत. नातेवाईकांनी नागरिकांच्या मदतीने दोघांना शेततळ्यातून बाहेर काढून आडुळ येथील शासकीय रुग्णालयात नेले, मात्र वैद्यकीय अधिकारी यांनी तपासून त्यांना मृत घोषित केले.

# नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भाजप कटिबद्ध

## माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची ग्वाही

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पायाभूत सुविधांचा दर्जा वाढवून नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भारतीय जनता पक्ष कटिबद्ध आहे, अशी ग्वाही पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी दिली. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून नवीन पनवेलमध्ये उभारण्यात आलेल्या समाजिक सभागृहाच्या उद्घाटनावेळी ते बोलत होते.

पनवेल विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांचा विकासनिधी आणि महापालिकेच्या माध्यमातून नवीन पनवेल सेक्टर १६, प्लॉट नंबर ३ येथील गार्डनमध्ये सामाजिक सभागृह बांधण्यात आले आहे. माजी उपमहापौर चारुशीला घरत यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून १९ लाख ११ हजार रुपये खर्चाचे हे काम पूर्ण झाले आहे. या



सभागृहाचे उद्घाटन शनिवारी (दि. ७) माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते आणि भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक गणेश कडू, अजय बहिरा, सुनील बहिरा, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, अ‍ॅड. वृषाली वाघमारे, प्रिती जॉर्ज, भाजपचे पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, अर्चित घरत, चंद्रकांत म्हात्रे, मनोज म्हात्रे, रघुनाथ बहिरा, सुजाता पाटील, सरोज मोरे, प्रभा सिन्हा, सोनाली कुदळे, सरिता पाटील, शिवानी रावते, मितेश ठाकूर, किशोर मोरे, कमलाकर घरत, विवेक पाटील, डॉ. शुभदा नील उपस्थित होते.

या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या सभागृहाचे काम चांगल्या दर्जाचे झाले असल्याचे गौरवोद्गार काढून चारुशीला घरत यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले.

# उन्हाळी पर्यटनाचा अखेरचा हंगाम; रायगडातील पर्यटनस्थळे बहरली

**पाली : प्रतिनिधी**

उन्हाळी सुट्ट्या संपत आल्या आहेत. त्यामुळे शाळा सुरू होण्यापूर्वी शेवटच्या वीकेण्डला रायगड जिल्ह्यातील पर्यटनस्थळे पर्यटकांनी बहरल्याचे दिसून आले.

विलोभनीय निसर्ग सौंदर्य, विस्तीर्ण समुद्र किनारे, ऐतिहासिक व धार्मिक स्थळे यामुळे उन्हाळी सुट्ट्यांमध्ये पर्यटकांची पावले रायगड जिल्ह्याकडे वळतात. मे महिन्यात अवकाळी पावसामुळे पर्यटकांचा हिरमोड झाला होता, परंतु सध्या पावसाने थोडी उसंत घेतल्याने सर्व ठिकाणी पर्यटकांची गर्दी होती. त्यामुळे पर्यटनावर अवलंबून असलेले हॉटेल व्यावसायिक, खानावळी, छोटे-मोठे दुकानदार, वाहतूकदार, राईड्सवाले यांनी समाधान व्यक्त केले.

दरम्यान, पर्यटकांच्या आलेल्या वाहनांमुळे मुंबई-गोवा महामार्ग, पाली-खोपोली राज्य महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर गर्दी झाली. काही ठिकाणी वाहतूक कोंडीदेखील पहायला मिळाली.

> **उन्हाळी सुट्ट्या आता संपणार आहेत. त्यामुळे कुटुंब व मित्रपरिवारासमवेत कोकणात रायगड जिल्ह्यामध्ये फिरायला आलो. येथील दिवेआगर, हरिहरेश्वर श्रीवर्धन तसेच अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली व महड येथे भेट दिली.**
> **-अनंत पाटील, पर्यटक, चोपडा, नाशिक**





# छत्रपती शिवाजी महाराज भारत गौरव पर्यटन रेल्वेला आज मुख्यमंत्री दाखवणार हिरवा झेंडा

## पर्यटक पहिल्या दिवशी देणार रायगड किल्ल्याला भेट

**मुंबई : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली इतिहासाचा आणि समृद्ध वारशाचा अनुभव देणारी छत्रपती शिवाजी महाराज भारत गौरव पर्यटन रेल्वेला सोमवारी (दि. ९) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हिरवा झेंडा दाखवून रवाना करणार आहेत. सकाळी ६.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ही ट्रेन मार्गस्थ होईल.

आयआरसीटीसी, रेल्वे मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने चालवल्या जाणाऱ्या या विशेष




पाच दिवसांच्या सहलीमध्ये राज्याच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ठिकाणांचा समावेश आहे. ही रेल्वे रायगड, शिवनेरी, प्रतापगड, पन्हाळा हे किल्ले, लाल महाल, कसबा गणपती, शिवसृष्टी या ठिकाणांना भेट देणार आहे.

या प्रवासात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट, इतिहासावर आधारित कार्यक्रम असणार आहेत. या रेल्वेचे सोमवारी सकाळी १०.३० वाजता माणगाव रेल्वेस्थानकात आगमन होईल. सर्व प्रवासी रायगड किल्ले येथे भेट देणार असून सायंकाळी ५ वाजता रेल्वेने पुणेकडे प्रयाण करतील. सोयीसुविधा, सांस्कृतिक समृद्धी आणि सहजतेवर भर देणारी ही रेल्वे प्रवाशांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरेल.

# जनतेने नाकारलेल्या राहुल गांधींनी आत्मपरीक्षण करावे

## मुख्यमंत्री फडणवीसांकडून लेखाने प्रत्युत्तर



### ‘मी महाराष्ट्रातील जनतेच्या या अपमानाचा नेहमीच निषेध करेन’

*मतदानापासून ते मतदारांच्या संख्येपर्यंत, राहुल गांधी खोट्या अफवा निर्माण करण्यासाठी, लोकशाही प्रक्रिया आणि संवैधानिक संस्थांबद्दल शंका निर्माण करण्यासाठी पुरावे विकृत करतात. महाराष्ट्रातील पराभवामुळे त्यांना आणि त्यांच्या मित्रपक्षांना किती दुःख झाले आहे हे मला माहिती आहे. पण जर तुम्ही महाराष्ट्रातील शेतकरी, लाडकी बहिणी, सामान्य जनता आणि सर्व नागरिकांच्या जनादेशाचा अशा प्रकारे अपमान करत राहिलात तर महाराष्ट्रातील जनता तुम्हाला कधीही माफ करणार नाही. मुख्यमंत्री म्हणून आणि त्यांचा सेवक म्हणून मी महाराष्ट्रातील जनतेच्या या अपमानाचा नेहमीच निषेध करेन, असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितले.*

**मुंबई : प्रतिनिधी**

राहुल गांधी यांनी एका इंग्रजी वृत्तपत्रात लिहिलेला ’मॅच फिक्सिंग महाराष्ट्र’ हा लेख एक्स प्लॅटफॉर्मवर शेअर केला. त्यात त्यांनी गंभीर आरोप केले. राहुल गांधींच्या या आरोपावर आता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लेखानेच प्रत्युत्तर दिले आहे.

२०२४ मध्ये महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांत मतदानाच्या दिवशी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ५८.२२ टक्के मतदान झाले होते; पण त्यानंतरही हे आकडे वाढत गेले. मतदानाची अंतिम टक्केवारी ६६.०५ टक्के असल्याचे दुसऱ्या दिवशी सकाळी सांगण्यात आले. म्हणजे या मतांमध्ये ७.८३ टक्क्यांची वाढ झाली. राज्यातील केवळ १२००० बूथमध्ये नव्या मतदारांची भर पडली. त्यातील ८५ मतदारसंत भाजपला विजय मिळाला होता, असा दावा राहुल गांधींनी केला. यावरदेखील देवेंद्र फडणवीसांनी उत्तर दिलं आहे. शेवटच्या तासात मतदान वाढलेल्या जागी एनडीए जिंकली म्हणणे हास्यास्पद आहे. कामठीचे उदाहरण त्यांनी दिले. पण जे उदाहरण त्यांनी दिले नाही, ते मी येथे देतो आहे. माढ्यात शेवटच्या तासात १८ टक्के मतदान झाले, तिथं शरद पवार गटाचा उमेदवार जिंकला. वणीत शेवटच्या तासात १३ टक्के मतदान झाले, तिथे उद्धव ठाकरे गटाचा उमेदवार जिंकला आणि श्रीरामपूरमध्ये १२ टक्के मतदान झाले, तिथं काँग्रेस विजयी झाली, असं देवेंद्र फडणवीसांनी प्रत्युत्तर दिले.

राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाबाबत काही पुरावे उपस्थित केले आहेत. निवडणूक आयोग त्यांना नक्कीच उत्तर देईल. पण मुख्य मुद्दा म्हणजे लोकशाही प्रक्रियेचा आणि लोकांच्या जनादेशाचा सतत होणारा अपमान...जनतेने राहुल गांधींना नाकारले आहे आणि सूड म्हणून ते जनतेला आणि त्यांच्या जनादेशाला नाकारत आहेत. यामुळे काँग्रेस पक्ष आणखी अडचणीत येईल. त्यांच्याच पक्षाचे आमदार एका दिवसात कोणालाही भेटण्याची वेळ मिळावी असे

आव्हान देणारी विधाने का करतात याचे त्यांनी आत्मपरीक्षण केले पाहिजे. लोकशाही प्रक्रिया आणि संवैधानिक संस्थांबद्दल सतत शंका उपस्थित करून ते देशाला कोणत्या दिशेने घेऊन जात आहेत आणि कोणते विष पसरवत आहेत याची त्यांना जाणीव असली पाहिजे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

काँग्रेसच्या काळात निवडणूक आयुक्त सरकारने थेटपणे निवडले. २६ पैकी २५ निवडणूक आयुक्त काँग्रेस सरकारने थेट निवडले. प्रथमच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विरोधी पक्षनेत्यासह आयुक्त नियुक्तीसाठी आयोग नेमला, असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितले. मोदी सरकारपेक्षा मनमोहनसिंग सरकारमध्येच मतदार वाढल्याचा दावाही देवेंद्र फडणवीसांनी केला. २०१४ ते २०१९ दरम्यान देशभर ६३ लाख मतदार वाढले. २०१९ ते २०२४ दरम्यान देशभर ७५ लाख मतदार वाढले. तर २००४ ते २००९ दरम्यान देशभर एक कोटी मतदार वाढल्याचे देवेंद्र फडणवीसांनी सांगितले. २०२४ मध्ये मतदारसंख्या वाढीत काहीही असाधारण नाही, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## अवैधरित्या मासेमारी करणाऱ्या बोटींवर कारवाई

**उरण : बातमीदार**

कोकण समुद्र किनारी वसलेल्या उरण, रायगड, मुंबई समुद्र परिसरातील ठिकठिकाणी पावसाळी बंदी काळातही अवैधरित्या मासेमारी करणाऱ्या मागील सात दिवसांत पाच मच्छीमार बोटी ताब्यात घेऊन काही बोटींवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

खोल समुद्रातील मासेमारीसाठी बंदीचे आदेश असतानाही आदेशाचे उल्लंघन करून उरण–मुंबई–रायगड समुद्र परिसरातील काही मच्छीमार नौका ठिकठिकाणी अवैधरित्या मासेमारी करीत असल्याचे आढळून आले आहे. मनुष्यबळ अपुरे असतानाही मत्स्य व्यवसाय विभागाच्या परवाना अधिकाऱ्यांकडून बंदी काळात बेकायदेशीर मासेमारी करणाऱ्या मच्छीमार बोटींवर कडक कारवाई केली जात आहे. बंदी काळात १ ते ७ जुन दरम्यान मत्स्यव्यवसाय विभागाच्या परवाना अधिकाऱ्यांनी अवैधरित्या मासेमारी करणाऱ्या पाच मच्छीमार बोटी ताब्यात घेऊन दंडात्मक कारवाई केली आहे. यापैकी एका बोटींकडून एक लाख ३० हजारांचा दंडही वसूल करण्यात आला आहे.

## मध्य रेल्वे मुंबई–मडगावदरम्यान एकेरी विशेष ट्रेन चालवणार

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे प्रवाशांच्या फायद्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई–मडगाव येथून एकेरी विशेष ट्रेन चालवणार आहे.

चालवण्यात येणाऱ्या विशेष ट्रेनमध्ये गाडी क्रमांक ०११७१ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १४ जून २०२५ रोजी सकाळी ७:३५ वाजता सुटेल आणि मडगाव येथे त्याच दिवशी २२:३० वाजता पोहचेल.

या गाडीला दादर, ठाणे, पनवेल, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, अरवली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थिवि आणि करमळी हे थांबे देण्यात आले आहेत.

या गाडीला तीन वातानुकूलित चेअर कार, एक व्हिस्टा डोम कोच, ०६ आरक्षित नॉन एसी चेअर कार, ०४ अनारक्षित नॉन एसी चेअर कार, १ सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन आणि १ एसएलआर. असे डबे आहेत. विशेष ट्रेन क्रमांक ०११७१ साठी विशेष शुल्कासह बुकिंग सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in संकेतस्थळावर दिनांक ७ जून २०२५ रोजी सुरू होईल.

या विशेष ट्रेनच्या तपशीलवार वेळा आणि थांब्यांसाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा एनटीईएस ॲप डाउनलोड करा. असे रेल्वे कडून सांगण्यात आले आहे.

## कळंबोलीतील धारण तलावामधील गाळ काढण्याची नागरिकांकडून मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरातील बहुतेक भाग सखल असल्यामुळे सिडकोने डच तत्त्वांनुसार पावसाळी पाणी आणि समुद्राच्या भरतीचे पाणी वसाहतीमध्ये शिरण्याऐवजी त्या पाण्याचा साठा धारण तलावात राहील या पद्धतीने तीन धारण तलाव बांधले, परंतु वर्षानुवर्षे या तलावातील गाळ न काढल्याने कमीत कमी पावसातसुद्धा कळंबोली उपनगर दोन ते चार फूट पाण्याखाली जात असल्याने कळंबोलीकरांची डोकेदुखी वाढली आहे.

सिडको महामंडळाने १९७०च्या दशकात नवी मुंबईतील अनेक वसाहतींचे निर्माण केले, मात्र कळंबोली वसाहतीमध्ये १९८९ साली पुरस्थिती आल्यानंतर या शहरासाठी सिडको मंडळाने ’डच पद्धती’ च्या प्रेरणेतून वसाहतीशेजारी कामोठेच्या दिशेला सूमारे ९ हेक्टर क्षेत्रफळावर धारण तलावाचे निर्माण केले.

कळंबोली वसाहतीचे एकूण क्षेत्रफळ साडेपाच चौरस किलोमीटर एवढे आहे. १९८९ साली पुराचा पहिला धोका वसाहतीला आल्यानंतर सिडको मंडळाच्या अभियंत्यांनी वसाहतीजवळ १३ हेक्टर, १२ हेक्टर आणि ७.७५ हेक्टर क्षेत्रफळाचे तीन धारण तलावाचे निर्माण केले.

परंतु निर्माणाच्या पहिल्या काही वर्षानंतर या तलावातील गाळ काढण्याचे काम करणे सिडको मंडळाने बंद केल्याचे येथील स्थानिकांनी सांगितले. त्यामुळेच सध्या पूरपरिस्थितीला कळंबोलीकर तोंड देत आहे. त्यामुळे लवकरात लवकर कळंबोलीतील धारण तलावामधील गाळ काढण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## बकरी ईदनिमित्त रक्तदान व आरोग्य शिबिर

**पाली : प्रतिनिधी**



ईद–उल–अजहा (बकरी ईद) निमित्त पनवेल मधील विविध सामाजिक संस्थांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षीही रक्तदान शिबिराबरोबरच आरोग्य, नेत्र तपासणी शिबिराचे आयोजनही करण्यात आले होते. नवीन पनवेल येथील दारूल अमन ट्रस्ट च्या मस्जिदीच्या आवारात हे शिबिर झाले.

दारुल अमन ट्रस्ट च्या पुढाकाराने व रोटरी ब्लड बँक, क्रिटीकेअर लाईफलाइन हॉस्पिटल पनवेल, शंकरा आय हॉस्पिटल यांच्या सहकार्याने हे शिबिर पार पडले. धर्माने सांगितलेल्या त्याग या मूल्यास अनुसरून सर्व धर्मियांनी एकत्र येऊन मानवतेचा संदेश देणारा

हा रक्तदान उपक्रम गेली सात वर्षे विविध सामाजिक संघटनांमार्फत राबविला जात आहे. यावर्षी शंभरहून अधिक जणांनी याचा लाभ घेतला. तर २३ जणांनी रक्तदान केले. महा. अंनिस शाखा पनवेल, महाराष्ट्र मायनॉरिटी एनजीओ फोरम पनवेल, ए. एफ. टी. ट्रस्ट पनवेल, मक्तब ए नुरुल उलूम, आई समाजकल्याण संस्था वावंजे, संविधान प्रचारक, सर्वोदय, ग्रामस्वराज्य समिती महाराष्ट्र, कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन या संस्थानी हा उपक्रम राबविला.

या वेळी दारूल अमन ट्रस्टचे ए. एम. इनामदार, अल्लाउद्दीन शेख, असिफ कुरेशी, आरती नाईक, श्री. बगाडे, प्रवीण जठार, बाबासाहेब चिमणे आदी मान्यवर उपस्थित होते.

## पनवेल, उरण बाजारपेठेत वटपौर्णिमेनिमित्त फणस विक्री

**पनवेल, उरण : वार्ताहर**



वटपौर्णिमा सण येत्या १० जून रोजी येत असल्याने घाऊक बाजारात कच्च्या फणसासोबत पिकलेल्या फणसाची चांगली आवक सुरु झाली आहे. त्यामुळे बाजारात फणसाचा गोड सुगंध सर्वांचे लक्ष वेधून घेत असून, फणसाच्या मागणीत वाढ होत असल्याचे चित्र पनवेल व उरण बाजारात दिसत आहे.

आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी सुवासिनी दरवर्षी वटपौर्णिमा दिनी उपवास करतात. यानिमित्त महिला एकमेकींना फळाचे वाण देत असतात. या वाणात आंब्यासह फणसाच्या गरांना मोठे महत्त्व आहे. घरात गोडधोड पदार्थ म्हणून स्त्रिया बरका फणसाच्या पोळ्या बनवतात. तर कापा फणस वाण भरण्यासाठी वापरतात. याच पार्श्वभूमीवर वटपौर्णिमा दिवसाच्या तीन–चार दिवस आधीच कोकणातून मोठ्या प्रमाणात पनवेल परिसरातील विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत.

उरण बाजारपेठेत सुनील दामगुडे यांनी फणस होलसेल भावाने ४० रुपये किलो दराने विकत आहेत. त्यांच्या सोबत त्यांचा मुलगा ओमकार दामगुडे व शिवाजी भोसले मदत करीत आहेत.

आम्ही पुणे येथून चांगले फणस आणतो गेली १० वर्षापासून दरवर्षी विकतो. ४० रुपये किलो दराने विकत आहोत. सुमारे ३ टन फणस विकले जातात. कापा फाणासास मागणी फार आहे, असे फणस विक्रेते सुनील दामगुडे यांनी सांगितले. पालवी हॉस्पिटल येथे फणसाचे गरे ७० रुपये पावकिलो या दराने आम्ही विकतो, असे अनंत मोरे यांनी सांगितले.

## ‘नैना’चा कर्मचारी लाच घेताना जाळ्यात

**नवी मुंबई :** सिडकोच्या नैना प्रकल्पातील भू–सर्वेक्षणाच्या कामासाठी ५० हजारांची लाच घेताना शासकीय कर्मचाऱ्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहाथ पकडले. आरोपी जिल्हा अधीक्षक कार्यालयातील भूमी अभिलेख विभागात लोकसेवक म्हणून कार्यरत आहे.

तक्रारदाराच्या मित्राची मालमत्ता नैना प्रकल्पांतर्गत येते. या भूखंडाचे सर्वेक्षण व आकारफोड करण्यासाठी शासकीय शुल्क भरल्यानंतरही कर्मचारी संजीपान सानप (वय ४४) याने कामासाठी दोन लाखांची लाच मागितली, मात्र लाच देण्यास इच्छुक नसल्याने त्यांनी एसीबीकडे तक्रार केली. त्यानुसार पोलीस निरीक्षक अरुंधती येळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सापळा लावला. पहिल्या टप्प्याचे ५० हजार घेताना सानपला रंगेहाथ पकडले.

## आज श्याम म्हात्रेंची पुण्यतिथी

**उरण :** काँग्रेस पक्षाचे दिवगंत नेते श्याम पदाजी म्हात्रे यांची सातवी पुण्यतिथी ९ जून रोजी आगरी शिक्षण संस्था, सेक्टर ६, खांदा कॉलनी पनवेल येथे होणार असल्याचे कामगार नेत्या श्रुती शाम म्हात्रे यांनी सांगितले. कार्यक्रमात महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर तसेच कर्करोगविषयी जनजागृती व्याख्यानाचे आयोजन, झुनझुनवाला आय हॉस्पिटल यांच्या माध्यमातून मोफत डोळे तपासणी शिबिर करण्यात आले आहे. सकाळी दहा वाजता आगरी शिक्षण संस्था, सेक्टर ६, खांदा कॉलनी, पनवेल येथे सकाळी १० वाजता कार्यक्रमाची सुरुवात होणार असून कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन श्रुती म्हात्रे यांनी केले आहे.

## ज्येष्ठाला २५ लाखांचा ऑनलाईन गंडा

**पनवेल : वार्ताहर**

एका ज्येष्ठ नागरिकाला २५ लाखांची फसवणूक झाल्याची घटना घडली आहे.

हनुमंत शंकर कदम (वय ६४, रा. बी–४५, रूम नं. ०२, शिवस्मृती सोसायटी, सेक्टर ७, नवीन पनवेल) असे फसवणूक झालेल्या ज्येष्ठ नागरिकांचे नाव आहे. त्यांना एक कॉल आला. आपण कुलाबा पोलीस ठाण्यातून गुप्ता नावाचा अधिकारी बोलत आहोत, अशी बतावणी केली. तसेच गुन्ह्यात अटक करावी लागेल, अशी धमकीही दिली. त्यातून स्वतः ला वाचवायचे असेल तर बंधन बैंक आणि यश बँकेत रोकड जमा करा, असे फर्मावले. कदम यांनी दोन्ही बँकेत २४ लाख ९० हजार रुपये त्या भामट्याला वळते केले. त्यानंतर कदम यांना फसवणूक झाल्याची खात्री पटताच एनसीसीआरपी पोर्टलवर तक्रार दाखल केली होती. त्यावरून खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक (गुन्हे) सचिन परदेशी यांनी गुन्हा दाखल करून सहाय्यक पोलिस निरीक्षक बळवंत पाटील यांच्याकडे तपास सोपविला आहे.

## महापारेषणचा वर्धापन दिन उत्साहात

**मुंबई : प्रतिनिधी**



वांद्रे येथील बालगंधर्व रंगमंदिरात महापारेषणचा २०वा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी आयोजिलेल्या राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभात महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे (महापारेषण) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे संचालक (स्वतंत्र) विश्वास पाठक, महापारेषणचे संचालक (संचलन) सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) अविनाश निंबाळकर, संचालक (वित्त) तृप्ती मुधोळकर, अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने, कार्यकारी संचालक (राज्य भार प्रेषण केंद्र) शशांक जेवळीकर उपस्थित होते.

सुरूवातीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर यांनी महापारेषणच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिलेल्या शुभेच्छा संदेशाचे वाचन करण्यात आले.

पान १ वरुन

## कळंबोलीत दाखले वाटप शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

या शिबिराला आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक राजू शर्मा, बबन मुकादम, रवींद्र भगत, प्रमिला पाटील, माजी कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, वाहतूक सेलचे प्रदेशाध्यक्ष प्रभूदास भोईर, देविदास खेडकर, भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, जिल्हा चिटणीस संदीप म्हात्रे, अमर ठाकूर, विजय भोईर, विलास किटे, युवा मोर्चा अध्यक्ष गौरव नाईक, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष प्रिया मुकदम, मनीषा निकम आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

शिबिरात उत्पन्नाच्या दाखला (नॉन क्रिमिलेअर), जातीचा दाखला, ज्येष्ठ नागरिक दाखला, स्थानिक रहिवाशी दाखला, आधार कार्ड, डोमेसाईल प्रमाणपत्र यांचे वाटप करण्यात आले. सर्वांना दाखले मिळावे कोणाला कोणतीही अडचण येऊ नये म्हणून महसूल विभागाच्या नायब तहसीलदार राजश्री जोगी, कळंबोली मंडळ अधिकारी बापू सरगर उपस्थित होते.

## मुंबई विद्यापीठाने किल्ले रायगडावर राबविले स्वच्छता अभियान

**रोहे : प्रतिनिधी**



मुंबई विद्यापीठ विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ श्रीमान बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्र व मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.रविंद्र कुळकर्णी यांच्या नियोजन व मार्गदर्शनाने ’स्वच्छता ही सेवा, या संकल्पनेला अनुसरून किल्ले रायगडावर स्वच्छता अभियान राबविण्यात आला.

या स्वच्छता अभियानाची सुरुवात मुंबई विद्यापीठाचे प्र– कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे यांच्या मार्गदर्शनाने झाली. या मार्गदर्शन प्रसंगी मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे, मुंबई विद्यापीठ विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. सुनील पाटील, मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे विशेष कार्य अधिकारी प्रा.सुशिल शिंदे, मुंबई विद्यापीठ क्रीडा विभागाचे संचालक डॉ. मनोज एन. रेड्डी, रायगड जिल्हा राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. तुळशिदास मोकल, विभागीय समन्वयक डॉ.दत्ता हिंगमिरे आदी उपस्थित होते.

या स्वच्छता अभियानात रायगड जिल्ह्यातील को.ए.सो,डॉ.सी.डी. देशमुख महाविद्यालय रोहा, को. ए. सो. आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालय नागोठणे,एम.बी. मोरे महिला महाविद्यालय, धाटाव, डॉ. नानासाहेब धर्माधिकारी महाविद्यालय कोलाड, जे. एन. पालीवाला महाविद्यालय पाली, सुंदरराव मोरे महाविद्यालय पोलादपूर, दोशी वकील महाविद्यालय गोरेगांव, एम.एम. जगताप महाविद्यालय, महाड, डी. जी. तटकरे महाविद्यालय, माणगाव, टीकमभाई मेहता महाविद्यालय माणगाव, गोखले एज्युकेशन संस्था महाविद्यालय श्रीवर्धन, भाऊसाहेब नेने महाविद्यालय पेण, अंजुमन इस्लाम डिग्री महाविद्यालय मुरूड, सी. के. टी. महाविद्यालय पनवेल, हिरवळ संस्था महाविद्यालय महाड, के. एल. इ. संस्था महाविद्यालय कळंबोळी, शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालय कळंबोळी, कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय उरण, पिल्लई अभियांत्रिकी महाविद्यालय पनवेल, कोकण ज्ञानपीठ अभियांत्रिकी महाविद्यालय कर्जत, बार्न्स महाविद्यालय पनवेल, वीर वाझेकर महाविद्यालय उरण ही महाविद्यालये व या महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे ५५० स्वयंसेवक सहभागी झाले होते.

या स्वच्छता अभियानात सहभागी स्वयंसेवकांनी हत्ती तलाव, गंगा सागर तलाव, राजभवन, राज सभा, नगारखाना, बाजारपेठ, होळीचा माळ, शिरकाई देऊळ, जगदीश्वर मंदिर, समाधी स्थळ, टकमक टोक आदी ठिकाणच्या परिसराची स्वच्छता केली.या अभियानात सहभागी स्वयंसेवकांनी कचरा संकलन व कचरा व्यवस्थापन प्रक्रियेसाठी महत्वपूर्ण योगदान दिले. स्वच्छता अभियान समारोप कार्यक्रमात सहभागी झालेल्या महाविद्यालयांचे, कार्यक्रम अधिकाऱ्यांचे व स्वयंसेवकांचे मुंबई विद्यापीठाचे प्र–कुलगुरू प्राचार्य डॉ.अजय भामरे यांनी कौतुक केले.

## एनएमएमटीच्या खारघर ते तळोजा फेज-२चा विस्तार

**नवी मुंबई, पनवेल : वार्ताहर**

एनएमएमटी परिवहन उपक्रमाची बस मार्ग क्र–४५ खारघर रेल्वे स्थानक ते तळोजा फेज–२ शिवसेना कार्यालय अशाप्रकारे आसुडगांव आगारातून कार्यान्वित आहे.

या मार्गामध्य खारघर रेल्वे स्थानक ते तळोजा फेज–२ शिर्के कॉलनीपर्यंत कोणताही बदल करण्यात आला नसून शिर्के कॉलनीपासून पुढे मारवा सेक्टर–२२, धनश्री गृहसंकुल सेक्टर ३७, सिडको कॉलनी, आनंदसागर व सुखसागर गृहसंकुल, दीपसागर गृहसंकुल, स्वप्नसागर गृहसंकुल सेक्टर–३४ पर्यंत सेवा वाढविण्यात आली आहे. प्रवाशांच्या मागणीनुसार आणि त्यांच्या सोयीसाठी करण्यात आलेल्या बस मार्ग क्र. ४५ मधील बदलांची नोंद घेऊन या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन परिवहनने केले आहे.

## निवडक

### महिलेचा विनयभंग करणाऱ्याला अटक

**मोहोपाडा :** रस्त्यावरून जाणाऱ्या एका महिलेचा विनयभंग झाल्याची घटना रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. वाशिवली येथे राहणारी एक २६ वर्षीय महिला कामावरून घरी परत जात असताना वाशीवली गावाजवळ चंदनकुमार या व्यक्तीने महिलेचा एकांताचा फायदा घेवून तिला पाठीमागून जावून पकडले. महिलेने विरोध करून आरडाओरड केला. त्यामुळे चंदनने तेथून पळ काढला. सदर पीडित महिलेने रसायनी पोलीस ठाण्यात चंदनच्या विरोधात तक्रार केली असता चीएनएस कलम ७४ प्रमाणे विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अपघातात कामगाराला दुखापत

**पनवेल :** महानगरपालिकेचा कंत्राटी सफाई कामगार सुनील महादेव सज्जन याला कामोठे येथील प्रभाग १२ येथे रस्त्यावर झाडू मारत असताना एका दुचाकीस्वाराने धडक दिली. अपघातानंतर तो पसार झाला. अपघातामुळे कामगाराचा पाय फ्रॅक्चर झाला असून, या प्रकरणी कामोठे पोलिसांनी नोंद केली आहे. अपघातानंतर उपस्थितांनी सफाई कामगाराला कामोठे येथील पनवेल महानगरपालिकेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. तेथे प्राथमिक उपचारांनंतर त्याला नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले आहे. उपचारादरम्यान एक्सरे काढल्यानंतर पायाचे हाड तुटले असल्याने ऑपरेशन करावे लागेल, असे सांगण्यात आल्याने त्याला पालिकेच्या सार्वजनिक रुग्णालयात वाशी येथे नेले आहे.

### खनिज वाहतूकप्रकरणी कारवाई

**पनवेल :** अपर तहसील कार्यालयाने पनवेल परिसरात अनधिकृत गौण खनिज वाहतुकी प्रकरणी अपर तहसील कार्यालयाकडून कारवाई सुरू आहे. एप्रिल २०२५ ते जूनपर्यंत तहसील कार्यालयाने ३३ वाहनांवर कारवाई केली. १२ वाहन चालकाकडून २७ लाख ४९ हजार ४९० रुपयांचा दंड जमा करण्यात आला आहे. १५ वाहन चालकांकडून दंड भरणे बाकी आहे. तर पाच वाहनांकडे वाहतूक पास असल्याने त्यांना मुक्त करण्यात आले आणि डेब्रिज असल्याने एक वाहनाला मुक्त करण्यात आले. अशा प्रकारे अनधिकृत गौण खनिज वाहतूक करणार्या वाहनांवर कारवाई सुरू राहणार असल्याचे अपर तहसीलदार जितेंद्र इंगळे यांनी सांगितले.

### ट्रेलरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**मोहोपाडा :** ट्रेलरने मोटरसायकलला धडक दिल्यामुळे झालेल्या अपघातात शिवराम नारावण म्हात्रे (वय ५०) यांच्या पोटावरून ट्रेलरचे चाक गेल्याने त्यांचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी ट्रेलर चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. किरण कृष्णा भोपी (रा. कोन) यांच्या वडिलांच्या सेवानिवृत्त कार्यक्रमानिमित्त रसायनी तील शिवराम, पत्नी संध्यासह (रा. क्याल, वाशिवली) मोटरसायकलवरून आले होते. कार्यक्रम संपवून रात्री नऊच्या सुमारास ते मोटरसायक्लने परत जात असताना नाईट रायटर चारच्या समोर कोनगाव येथे ट्रेलरने मोटरसायकलला धडक दिली. या धडकेत संध्या जखमी झाल्या, तर शिवराम यांच्या पोटावरून ट्रेलरचे चाक गेल्याने त्यांचा मृत्यू झाला.

# खारघर येथे विविध समाजोपयोगी कार्यक्रम

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गोरगरिबांचे कैवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून खारघर भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा आणि खारघरचा राजा मंडळाच्या वतीने शनिवारी (दि.७) खारघर येथे विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सत्कार, ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटप तसेच गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले. माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून साहित्याचे वाटप केले आणि कार्यक्रमाच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल आयोजकांचे कौतुक केले.

माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी नुकतीच वयाची वर्षे पूर्ण केली असून, त्यांनी अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. या निमित्ताने खारघर शहरातील दहावी आणि बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच, ज्येष्ठ नागरिकांना मोफत छत्री वाटप करण्यात आले, तर गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत म्हणून वह्यांचे वाटप करण्यात आले.

या वेळी भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, खारघरचा राजा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष विजय पाटील, विनीता पाटील, भाजप महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, युवा मोर्चा अध्यक्ष मितेश पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते कळंबोलीत टॅक्सी स्टँडचे उद्घाटन



**पनवेल : वार्ताहर**

लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त कळंबोली सेक्टर १७ येथे दैवत टॅक्सी स्टँड या नावाने टॅक्सीसेवा चालू करण्यात आली आहे. या स्टँडचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. ८) झाले.

उद्घाटन समारंभास भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, कळंबोली शहराध्यक्ष अमर पाटील, माजी शहराध्यक्ष रविनाथ पाटील, भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, माजी नगरसेवक बबन मुकादम, राजू शर्मा, रवींद्र भगत, प्रमिला पाटील, माजी जि.प. सभापती प्रिया मुकादम, वाहतूक संघटनेचे प्रभूदास भोईर, अमर ठाकूर, विजय भोईर, टॅक्सी स्टँडचे संस्थापक महेश बारगजे व त्यांचे सहकारी उपस्थित होते.

कळंबोलीतील नागरिकांना मुंबई, नवी मुंबई, रायगड आणि इतर ठिकाणी जाण्यासाठी ही टॅक्सीसेवा चालू करण्यात आली आहे. या सुविधेचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन बबन बारगजे यांनी केले आहे.

## दोन महिला सायकलने जाणार युरोपला

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून मदत आणि शुभेच्छा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधून दोन महिला सायकलने युरोपला जाणार आहेत, त्यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या आणि ५० हजार रुपयांची मदत केली आहे. यामध्ये वंदना महेंद्र भावसार आणि अजिता बाबूराज या ५८ वर्षीय महिला १३५० किलोमीटरचा युरोपचा सायकल प्रवास करणार आहेत.



२१ ते २८ जून २०२५ दरम्यान, नेदरलँड, बेल्जियम आणि पॅरिस आणि ८ ते २० जुलै २०२५ या कालावधीत जर्मनी ते ऑस्ट्रिया असा सायकल प्रवास त्यांचा होणार आहे. महिलां सक्षमीकरणाचा संदेश, शून्य कार्बन फूटप्रिंट – जगाला वेगळ्या दृष्टीने पहा या टॅगलाइनसह स्व–समर्थित सायकलिंग करणार आहेत. या पूर्वी या दोघी मैत्रिणींनी संपूर्ण भारतात आणि देशाबाहेरही सायकलिंग केले आहे.

दरम्यान, त्यांनी शनिवारी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सदिच्छा भेट घेतली. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वंदना महेंद्र भावसार आणि अजिता बाबूराज यांना ५० हजार रुपयांची मदत करून त्यांच्या प्रवासाला शुभेच्छा दिल्या.

# परेश ठाकूर यांच्या हस्ते भिंगारी येथे जिम आणि साहित्याचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तरुणांना चांगल्या प्रकारच्या सवयी लावून आदर्श निर्माण करण्यासाठी जिमचा उपयोग होईल, असा विश्वास पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भिंगारी येथे जिम आणि साहित्यांच्या उद्घाटनावेळी व्यक्त केला.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. त्यानुसार भिंगारी येथे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महपाालिकेच्यावतीने जय हनुमान व्यायाम शाळेत विविध साहित्य उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. त्यानुसार माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याहस्ते जिमचे आणि साहित्याचे उद्घाटन शनिवारी झाले.

या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक गणेश कडू, अजय बहिरा, सुनील बहिरा, प्रतिक बहिरा, बाळकृष्ण परदेशी, सुनिल परदेशी, जयनाथ मढवी, काशिनाथ परदेशी, जोमा परदेशी, रवी जाधव, धोंडू परदेशी, रूपेश परदेशी, जगदीश परदेशी, रघुनाथ परदेशी, पद्माकर पालव, सूरज परदेशी, किरण मढवी, रोहित शिवकर, विजय पवार, दीपक शिंदे, संजय परदेशी, रोहित परदेशी, अभि लाड, महेश परदेशी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



## भाजप नेते बाळासाहेब पाटील यांचे अभीष्टचिंतन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकांच्या अडीअडचणीत कायम सोबत राहणारे नेते म्हणून बाळसाहेब पाटील कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांना दीर्घायुष्य लाभो, अशा शुभेच्छा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भाजपचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील यांना दिल्या आहेत.

कोकण म्हाडाचे माजी सभापती तथा भारतीय जनता पक्षाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य बाळासाहेब पाटील यांचा वाढदिवस विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानुसार युवा महाराष्ट्र प्रतिष्ठानच्या वतीने रिक्षाचालकांना सीषनजी कुपन, गरजूंना मोफत धान्य, ज्येष्ठ नागरिकांना गरम पाण्याची पिशवी, नागरिकांना मोफत छत्री तसेच आयुष्यमान भारत कार्ड वाटप करण्याचा कार्यक्रम शनिवारी आमदार विक्रांत बाळसाहेब पाटील जनसेवा कार्यालयात झाला तसेच या ठिकाणी बाळासाहेब पाटील यांचा अभिष्टचिंतनाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देऊन रिक्षा चालकांना सीएनजी कूपन, तसेच नागरीकांना छत्री, धान्य, आयुष्यमान कार्ड आणि गरम पाण्याच्या पिशवीचे वाटप केले तसेच पुष्पगुच्छ देऊन बाळासाहेब पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमावेळी आमदार विक्रांत पाटील, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शिवसेनचे जिल्हा प्रमुख रामदार शेवाळे, माजी नगरसेवक गणेश कडू, समीर कदम, भाजपचे पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, सरचिटणीस अमित ओझे, रूपेश नागवेकर, प्रितम म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, या वेळी आयोजीत करण्यात आलेल्या अभिष्टचिंतन सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांनी बाळासाहेब पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.







**पनवेल : शिवाजीनगर येथील श्री राधा कृष्ण मंदिराचा वर्धापन रविवारी साजरा झाला. वर्धापन दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देऊन मनोभावे दर्शन घेतले. या वेळी ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर, व्ही.के. ठाकूर, शशिकांत ठाकूर, धनाजी ठाकूर, किशोर ठाकूर, टी.के. ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य सागर ठाकूर, मयूर ठाकूर, जी.के. ठाकूर आदी उपस्थित होते.**





**पनवेल : दैनिक महाराष्ट्र सम्राटचे संपादक चंद्रकांत भोईटे यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना वाढदिवसाच्या व अमृत महोत्सवी वर्ष पदार्पणानिमित्त शुभेच्छा दिल्या. दरम्यान, भोईटे यांनाही वाढदिवसानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल आणि गणेश भोईटे उपस्थित होते.**

## रसायनीच्या अनिल दाभाडे यांचा काजवा काव्यसंग्रह प्रकाशित

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी मोहोपाडा, पाताळगंगा, रीस, चांभार्ली परिसरातील सर्वांना सुपरिचित असलेले कवी, लेखक, चारोळीकार, पक्षीनिरीक्षक, निवेदक, प्रकाश योजनाकार, पत्रलेखक अशा विविध नावाने ओळखले जाणारे कवी अनिल दाभाडे यांचा नुकताच काजवा हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे.

काजवा हा काव्यसंग्रह अहिल्यानगरच्या काव्यगंध या नामांकित प्रकाशन संस्थेतर्फे प्रकाशित करण्यात आला आहे. काजवा या काव्यसंग्रहाला अँड. अक्षशिला शिंदे, काव्यगंध संस्थापिका यांची प्रास्तावना लाभली आहे. तसेच संपादक प्रशांत गोरे यांचे मोलाचे




मार्गदर्शन लाभले आहे.

अखंडपणे साहित्य लेखन करून दररोज नवनवीन विषयावरच्या चारोळ्या व कविता दैनंदिन लेखनातून आपल्या वाचकांना अनिल दाभाडे देत असतात. आता त्यांच्या काजवा हा काव्यसंग्रह प्रकाशित झाल्यामुळे त्यांना अनेक मान्यवरांनी, नातेवाईक, तसेच मित्रमंडळी यांनी व असंख्य वाचकांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयातर्फे वृक्षारोपण

**उरण : प्रतिनिधी**

फुंडे येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने उरण तालुक्यात विविध ठिकाणी जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत दिघोडे येथील महात्मा गांधी विद्यालय, बापूजीदेव मंदिर परिसर, खारपाटील महाविद्यालय चिरनेर आणि रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील हायस्कूल पिरकोन या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले वृक्षारोपणा सोबतच चिरनेर येथील बापूजी देव देवराई परिसरात स्वच्छता मोहिमाही राबविण्यात आली. या कार्यक्रमास वीर वाजेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, उपप्राचार्य गजानन चव्हाण, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा.राम गोसावी, राष्ट्रीय छात्र सेनेचे विभाग प्रमुख डॉ. राजकुमार कांबळे, यांच्यासह राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि स्वयंसेविका उपस्थित होते.

महात्मा गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री फल्ले सर, चिरनेर येथील खारपाटील हायस्कूलचे प्राचार्य पट्टेबहादूर सर, पिरकोन येथील शाळा व्यवस्थापन समितीचे प्रमुख श्री जीवन गावंड, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी निकेतन रमेश ठाकूर तसेच फ्रेंड्स ऑफ नेचर चिरनेर संस्थेचे दिनेश चिरनेरकर हे विविध ठिकाणी झालेल्या वृक्षारोपण कार्यक्रमात सहभागी झाले होते.

महाविद्यालयाच्या वतीने चिंच, कडुलिंब, आवळा, पिंपळ आणि करंज अशी विविध प्रकारची सुमारे १०० झाडे व काळी मिरी, वेलदोडे, दालचिनी, तेज पत्ता, कळी हळद, अडुळसा आदी औषधी वनस्पती लावण्यात आली.



## संपादकीय

# राहुल गांधींचे पोकळ दावे

लोकशाहीच्या दृष्टीने निवडणूक प्रक्रिया ही पारदर्शक, निष्पक्ष आणि सर्वसामान्य नागरिकांच्या विश्वासास पात्र असावी लागते. अशा परिस्थितीत कोणत्याही राजकीय नेत्याने आरोप करताना ठोस पुरावे मांडणे आवश्यक असते; अन्यथा अशा आरोपांमुळे लोकांमध्ये संभ्रम निर्माण होतो आणि संस्थांवरचा विश्वास डळमळीत होण्याची भीती निर्माण होते. काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी नेमकी हीच चूक वारंवार करत आहेत.

**गतवर्षी झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीबाबत काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी एक लेख लिहून निवडणूक प्रक्रियेवर गंभीर आक्षेप नोंदवले. त्यांनी आरोप केला की, निवडणूक आयोग भाजपच्या दबावाखाली काम करत आहे आणि निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता नसल्यामुळे लोकशाही धोक्यात आली आहे. त्यांनी काही ठिकाणी मतदान केंद्रांवरील ईव्हीएम मशीन्स नीट काम करत नव्हत्या तसेच काही ठिकाणी मतदानाचे आकडे सुसंगत नव्हते, असेही नमूद केले. या आरोपांवर भाजपकडून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी राहुल गांधी यांच्यावर जोरदार टीका केली. त्यांनी म्हटले की, राहुल गांधींना आगामी बिहार निवडणुकीत पराभवाची भीती वाटू लागल्यामुळे ते आधीच निवडणूक प्रक्रियेवर संशय घेत आहेत. याला कोणतेही तथ्य नाही. महाराष्ट्रातील जनतेने महायुतीवर विश्वास ठेवला आहे आणि मतदार हे सुजाण आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही राहुल गांधींना प्रत्युत्तर देताना स्पष्ट केले की, हा निव्वळ जनतेच्या कौलाचा अपमान आहे. जेव्हा निकाल अनुकूल येतात तेव्हा निवडणूक आयोगावर विश्वास ठेवला जातो, आणि अनुकूल नसले की लगेचच प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. या वादात निवडणूक आयोगानेही भूमिका स्पष्ट करत एका अधिकृत निवेदनात म्हटले की, महाराष्ट्रातील मतदान प्रक्रिया पारदर्शक आणि नियमबद्ध होती. काही तांत्रिक अडचणी भले काही ठिकाणी झाल्या असतील, पण त्यांचा निकालावर कोणताही परिणाम झालेला नाही. आयोगाने आकडेवारी सादर करत दाखवले की, सर्व मतदान केंद्रांवरील ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशीनची तपासणी झालेली असून त्यात कोणतीही त्रुटी आढळलेली नाही. आयोगाच्या या स्पष्टीकरणामुळे राहुल गांधींच्या आरोपांना फारसे समर्थन लाभले नाही. अनेक राजकीय विश्लेषकांनीही राहुल गांधींच्या वक्तव्याला अतिरंजित आणि एक राजकीय डाव म्हणून पाहिले. खरंतर हा प्रकार नवीन नाही. २०१९च्या लोकसभा निवडणुकीनंतर तसेच २०२०च्या काही विधानसभा निवडणुकांमध्येही काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांनी निवडणूक प्रक्रियेवर ताशेरे ओढले होते, मात्र त्या वेळीही आयोगाने यावर स्पष्ट भूमिका घेतली होती. सर्वोच्च न्यायालयानेही अनेक वेळा स्पष्ट केले आहे की, ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट यंत्रणा ही विश्वासार्ह आहे आणि कोणत्याही प्रकारची छेडछाड शक्य नाही. तरीदेखील राहुल गांधी हे वारंवार एकच मुद्दा पुन्हा पुन्हा उपस्थित करत आहेत. निवडणूक प्रक्रियेवर संशय उपस्थित करणे हा दबावतंत्राचा भाग असू शकतो. विरोधक आपला जनाधार बळकट करण्यासाठी तसेच निवडणूक व्यवस्थेतील संभाव्य त्रुटींचा मुद्दा जनतेसमोर ठळकपणे मांडण्यासाठी अशा पद्धतीचे आरोप करतात. तथापि, या आरोपांना विश्वसनीयतेचा आधार नसेल, तर याचा परिणाम उलटाच होऊ शकतो. महाराष्ट्रातील मतदार हे सुजाण असून जेव्हा कुणी राजकीय नेते अशा प्रकारे निवडणूक प्रक्रियेवर शंका घेतात, तेव्हा मतदारही त्यावर विश्वास ठेवत नाही.**

# कर्जतमधील जैन संन्यासाश्रम अन् तपश्चर्या परंपरा




**खबरबात**
विजय मांडे

जैन धर्माविषयी अनेक जणांचे खूप गैरसमज आहेत. ते पैशांच्या मागे लागतात. हे सर्रास बोलले जाते, मात्र कर्जत तालुक्यातील जैन धर्मीय वेगळे आहेत. या समाजाच्या तीन महिलांनी दीक्षा घेऊन संन्यास घेतला आहे, तर अडीच वर्षांपूर्वी एका १४ वर्षांच्या बटुने दीक्षा घेऊन संन्यासाश्रम स्वीकारला आहे. हल्लीच्या युगात ही फार कठिण गोष्ट आहे.

संपूर्ण रायगड जिल्ह्यात कर्जत असे आहे की तेथील जैन धर्मियांमध्ये समर्पणाची भावना आहे. प्रसिद्ध सामजिक कार्यकर्ते स्व. मांगीलाल भुरमल ओसवाल यांचा नातू व योगेश मांगीलाल ओसवाल यांचा सुपुत्र कु. कलश याने संन्यासाश्रम घेण्यापूर्वी दोन वर्षांपूर्वीच म्हणजे त्याचे वय जेमतेम १२ वर्षांचे असताना संन्यास स्वीकारण्याचा निर्णय घेतला आणि तो त्याने २९ डिसेंबर २०२२ रोजी दीक्षा घेऊन तालुक्यातील संन्यासाश्रम घेण्याची अग्निदिव्य परंपरा सुरू ठेवली. कलश हा रायगड जिल्ह्यातील पहिला पुरुष दिक्षार्थी ठरला आहे तसेच ४७ दिवस उपवास करण्याची परंपरासुद्धा वर्षानुवर्षे सुरू आहे. ही तपश्चर्य करण्याची महिलावर्गाची संख्या जास्त आहे.

आपल्या जेवणात थोडे इकडचे-तिकडचे झाले तरी काही घरांमध्ये काय काय घडते ते आपण सर्वजण अनुभवच असतो. या मोहजालात अनेक जण अडकत असतात. त्या नादात अनेकांची कुटुंबही उद्ध्वस्त झाली आहेत आणि या युगात सर्व गोष्टींचा त्याग करून संन्यासाश्रम स्वीकारणे म्हणजे अगदी मनावर दगड ठेवून निर्णय घेणे आहे. हा निर्णय कर्जत तालुक्यातील चार जणांनी घेतला. त्यात तीन महिला आणि एक छोटा मुलगा आहे. ज्याचे वय शिकण्याचे आहे. खेळण्या-बागडण्याचे आहे त्या वयात कलशने दीक्षा घेऊन संन्यास घेतला ही गोष्ट फार मोठी आहे.

तालुक्यातील पहिल्या दिक्षार्थी कोंदिवडे गावातील एका जैन भगिनीने ७५ वर्षांपूर्वी दीक्षा घेतली होती. त्या सगणा बाई च्या साध्वीजी दिव्यप्रभाश्री महाराज झाल्या त्या आता ८८ वर्षांच्या आहेत. त्यानंतर मार्च २०१४मध्ये टीनाच्या झाल्या. साध्वी मोक्षार्थ रूची महाराज यांचे घर जैन मंदिराच्या समोरच आहे, मात्र तरीही त्या कर्जतमध्ये आल्यास त्यांना घरी जाता येत नाही, तर त्यांचे आई-वडीलही त्यांचे चरण स्पर्श करतात. २०२० साली रूचिता सोलंकीने दीक्षा घेतली व त्या साध्वी वर्षा महाराज झाल्या. या दोघीही उच्चशिक्षित होत्या. तरीही त्यांनी संन्यासाश्रम स्वीकारला. २९ डिसेंबर २०२२ रोजी कलश ओसवाल याने दीक्षा घेऊन ते मुनिराज कल्पसूत्र विजयजी महाराज झाले.

कलशचा दीक्षा समारंभ आगळावेगळा ठरला. कर्जत शहरातून मिरवणूक दीक्षा सोहळ्याच्या शामियानात आल्यानंतर अनेक धार्मिक कार्यक्रम करण्यात आले. त्यावेळी ५० जैन मुनी व जैन साध्वी उपस्थित होत्या. दीक्षा सोहळ्याच्या पूर्वसंध्येला कलशने आपल्या जीवनातील शेवटच्या सर्व हौस पूर्ण केल्या तसेच त्याची आई व त्याच्या कुटुंबियांची शेवटची गळाभेट झाली. त्यावेळी उपस्थितांचा भावनेचा बांध फुटला आणि अक्षरशः शामियान्यामधील वातावरण एकदम गंभीर झाले. काही जण हमसाहमशी रडत होते. त्यातून कर्जतच्या तत्कालीन नगराध्यक्ष सुवर्णा जोशीसुद्धा सुटल्या नाहीत. खासदार श्रीरंग बारणे यांनी कलशची त्याच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली व त्याच्या या निश्चयपूर्वक निर्णयाचे स्वागत केले होते.

दीक्षा समारंभ सुरू झाला आणि वातावरण गंभीर झाले. या वेळी कलशने मनसोक्त नाचून घेतले आणि त्याला जैन मुनी अजितरत्न सुरीश्वर महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली मुनिराज अममपद्म विजय महाराज, साध्वी दिव्यप्रभाश्री महाराज, साध्वी चंद्र दर्शना महाराज, साध्वी श्री ध्येय प्रज्ञाश्री महाराज, साध्वी मोक्षारूची (टीना) महाराज, गणधररत्न विजय महाराज क्षेमरत्न विजय महाराज या जैन मुनी व साध्वींनी कलशला दीक्षा दिली. या वेळी गुरूपूजन, अंतिम तिलक, योगी वस्त्र, दांडा, नवकार माला, असन, संथारो, नामकरण यासाठी बोली करण्यात आली.

यानंतर कलश हा जैन मुनींचा वेश परिधान करण्यासाठी गेला. त्यानंतर त्याने आपले किमती कपडे, दागिने, मोबाईल पैसे आदींचा त्याग केला व त्याचे मुंडन करण्यात आले. पुन्हा तो शामियान्यात आला तेव्हा उपस्थितांना अश्रू आवरत नव्हते. त्याही परिस्थितीत उपस्थितांमध्ये त्याचा चरण स्पर्श करण्याची धडपड होती. त्याचे मुनिराज कल्पसूत्र विजय महाराज असे नामकरण करण्यात आले. हे नाव सर्वांना सहज उच्चारता यावे यासाठी कीर्ती कमलेश ओसवाल आणि भावना जितेंद्र परमार यांनी हे नाव निवडले. त्यानंतर उपस्थितांनी मुनिराज कल्पसूत्र विजय महाराजांस अभिवादन केले आणि दीक्षा सोहळा जड अंतःकरणाने पार पडला. दोन दिवस जैन मंदिरात राहून मुनिराज कल्पसूत्र यांनी आपल्या गुरूजनांसह भिवंडीकडे प्रस्थान केले.

संन्यास घेणे म्हणजे महादिव्यच, कारण आता त्यांना अनेक बंधने आहेत. कोणत्याही स्त्री स्पर्श करू शकणार नाहीत. अगदी जन्मदात्या आईलासुद्धा, मोबाईल वापरता येणार नाही. फक्त पांढरे सफेद कपडेच नेसायचे, टीव्ही बघू शकत नाहीत, आयुष्यभर पायी प्रवास करायचा, झोपायला गादी, उशीचा वापर करायचा नाही, सुयादयाच्या नंतर खायचे, सुर्यास्तानंतर खायचे नाही, केस हाताने उपटून काढायचे, मिळेल ते खायचे, नाही मिळेल तर उपाशी राहायचे, खाताना किंवा पिताना कोणी बघायचे नाही याचे दक्षता घायची, भिक्षा मागून खायचे. कुटुंबातील कुणीही मरण पावले तरी यायचे नाही.

यंदा कपड्यांचे व्यापारी योगेश ओसवाल यांच्या धर्मपत्नी मीना योगेश ओसवाल आणि डॉ. मनीष जैन यांच्या सौभाग्यवती मीनल जैन या दोन जैन भगिनींनी लोणावळ्यामधील अल्केश मोदी धर्मस्थानामध्ये ४७ दिवसांचा उपवास करून तपश्चर्या केली. त्यांची कर्जतकर जैन बांधव भगिनींनी रथातून मिरवणूक काढून त्यांना सन्मानाने आपापल्या निवासस्थानी पाठवण्यात आले. प्रत्येक वर्षी अशा प्रकारची तपश्चर्या केली जाते. यामध्ये पुरुषांचाही सहभाग असतो. विशेष म्हणजे तपश्चर्या करणाऱ्या मीना ओसवाल यांचा संन्याश्रम स्वीकारलेला सुपुत्र कलश म्हणजेच मुनीराज कल्पसूत्र विजय महाराज यांनी मीना ओसवाल यांच्या गळ्यात मोक्षमाला घालून आशीर्वाद दिला. म्हणजे मुलाने आईला आशीर्वाद देण्याची बहुदा ही पहिलीच घटना असावी.



## बदलते तंत्रज्ञान

# ॲमेझॉनवरून ऑर्डर करताय? नवीन नियम एकदा वाचा

आपण सगळेच जण सध्या ऑनलाईन शॉपिंगवर अवलंबून असतो, पण आता अमेझॉनने सर्व ग्राहकांसाठी एक नवीन नियम सादर केला आहे; जे वाचून छोट्या-छोट्या गोष्टींसाठी खरेदी करताना तुम्हाला विचार करावा लागणार आहे.




अमेझॉन इंडियाने प्रत्येक ग्राहकाच्या ऑर्डरवर ५ रुपये मार्केटप्लेस फी लागू करणार आहेत. लाखो विक्रेत्यांना विस्तृत श्रेणीतील उत्पादने प्रदान करत असताना प्लॅटफॉर्मच्या ऑपरेशनल खर्चाला पाठिंबा देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. सर्व ग्राहकांना लागू होणारी ही फी मौल्यवान खरेदी अनुभव प्रदान करण्याच्या अमेझॉनच्या वचनबद्धतेला समर्थन देते; असे कंपनीने एका ब्लॉग पोस्टमध्ये म्हटले आहे. जागतिक ई-कॉमर्स पद्धतींमध्ये हे सामान्य असले तरी, हे पाऊल प्राइम सदस्यांसह भारतीय ग्राहकांसाठी एक लक्षणीय बदल दर्शवणार आहे. झोमॅटो आणि स्विगी या कंपन्या सुद्धा गेल्या काही काळापासून ग्राहकांसाठी समान शुल्क आकारत आहेत.


Amazon.inवर दिलेल्या प्रत्येक ऑर्डरवर मार्केटप्लेस फी ५ रुपये निश्चित आकारली जाते. कंपनीच्या मते, ही फी त्यांच्या विक्रेत्यांच्या इकोसिस्टम आणि लॉजिस्टिक्स पायाभूत सुविधा राखण्यास मदत करते. चेकआउट दरम्यान ते एक स्वतंत्र लाइन आयटम म्हणून दिसेल, ज्यामुळे ग्राहकांसाठी पारदर्शकता सुनिश्चित होईल.

गिफ्ट कार्ड खरेदी (फिजिकल आणि डिजिटल); अमेझॉन बिझनेस, बाजार, अमेझॉन नाऊ आणि अमेझॉन फ्रेश द्वारे ऑर्डर; रिचार्ज, बिल पेमेंट, तिकीट बुकिंग आणि सबस्क्रिप्शन सारख्या डिजिटल सेवा; एक्सचेंज शुल्क आधीच लागू असलेल्या ऑर्डर तसेच डिलिव्हरीच्या वेळी पैसे भरताना तुम्हाला ही फी दिसणार नाही, जोपर्यंत कंपनीचे नियम बदलत नाहीत.

प्राइम ग्राहकांनासुद्धा ५ रुपयांच्या शुल्कातून सूट नाही. मार्केटप्लेस फी सर्व युजर्सना समान प्रमाणात लागू होते, मग सदस्यत्वाची स्थिती काहीही असो.

मार्केटप्लेस फीच्या आसपासच्या परतफेड धोरणे ऑर्डरचा किती भाग रद्द केला जातो, नाकारला जातो किंवा परत केला जातो यावर अवलंबून असतात. ब्लॉग पोस्टमध्ये, अमेझॉनने परतफेड धोरणाची सविस्तर माहिती दिली आहे.

# क्रांतिकारक वीर बिरसा मुंडा



**निमित्त**

बिरसा मुंडा यांचा आज स्मृतिदिन. बिरसा मुंडा हे एक भारतीय आदिवासी क्रांतिकारक होते. ते आदिवासी समाजाचे वीर नायक होते. १९व्या शतकातील शेवटच्या वर्षात मुंडा जमातीच्या आदिवासींकडून इंग्रज सरकारविरुद्ध जनआंदोलने केली, त्याचे नेतृत्व बिरसा मुंडा यांनी केले होते. त्यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झारखंडमधील उलीहातू येथे झाला.

बिरसा मुंडा यांचे बालपण इतर मुंडा आदिवासी मुलांप्रमाणेच जंगलात व ग्रामीण भागात व्यतीत झाले. त्यांचे वडील जनावरे चारण्याचे काम करायचे. तेही वडिलांसोबत रानात जाऊन धनुर्विद्या व नेमबाजीचा सराव करायचे. बालपणीच त्यांचा नेम फार चांगला होता. पुढे मुंडा प्रसिद्ध वैष्णव भक्त आनंदानंद पांडे यांच्या संपर्कात आले.

वाचन व लेखन येत असल्याने बिरसा मुंडे यांनी महाभारत, रामायण व गीता असे अनेक हिंदू धार्मिक ग्रंथांचे वाचन केले. त्यांच्यासोबत राहून इंग्रजांच्या काळ्या धोरणाचा त्यांना फार तिरस्कार यायचा. बिरसा मुंडा यांनी १९००मध्ये इंग्रजांविरुद्ध विद्रोह करण्याची घोषणा केली व म्हटले, आम्ही ब्रिटिश शासनाच्या तत्वांविरुद्ध विद्रोहाची घोषणा करतो. आम्ही कधीच ब्रिटिशांच्या कायद्यांना मानणार नाही. आम्ही इंग्रजांचे अधिपत्य स्वीकारत नाही.

जो इंग्रज आमच्याविरुद्ध उभा राहील त्यास आम्ही यमसदनी पाठवू. यामुळे संतप्त ब्रिटिश सरकारने आपली सेना बिरसा मुंडा यास पकडण्यासाठी पाठविली. बिरसा मुंडा यांनी विविध जमातीच्या गटांना एकत्र आणले. त्यांना इंग्रजांविरुद्ध लढण्यास प्रेरित केले. इंग्रज सरकारने बिरसा मुंडा यास अटक केली. त्यांच्यासोबत ४६० आदिवासी युवकांनाही अटक करण्यात आली. अशा या थोर क्रांतिकारकाचे ९ जून १९०० रोजी निधन झाले.

बिरसा यांच्या आंदोलनाची ब्रिटिशांना गंभीरपणे दखल घ्यावी लागली. ब्रिटिशांनी 'छोटा नागपूर टेनन्सी क्टख्र मंजूर करून आदिवासींचे जमिनीवरील हक्क मान्य केले (१९०२). आदिवासी-हक्क, स्त्री-स्वातंत्र्य, मानवी प्रतिष्ठा यांच्यासाठी लढा देणारा पहिला आदिवासी नेता म्हणून बिरसा यांची ओळख आहे. रांची येथील डिस्टिलरी पुलाजवळ बिरसांची समाधी असून तेथे त्यांचा पुतळा उभारला आहे तसेच रांची येथील केंद्रीय कारागृहास आणि आंतरराष्ट्रीय विमानतळास बिरसा मुंडा यांचे नाव देण्यात आले आहे.

बिरसा यांनी शिक्षणाचा उपयोग आदिवासींचं जीवनमान उंचावण्यासाठी केला. आदिवासींचे जीवन अभ्यासले. जंगलात अनेक दिवस काढले. आदिवासींमध्ये जनजागृती केली. भारतीय संस्कृती, आयुर्वेद समजून घेतले. औषधी विज्ञानात पारंगत झाले. रुग्णांची सेवा करू लागले. घर स्वच्छ ठेवा. खोटं बोलू नका. एकजूट राहा. निर्णय पंचायतकडून करा, असा संदेश त्यांनी आदिवासींना दिला.

देशभरात विशेषतः बिहार, ओडिशा, झारखंड, छत्तीसगड, पश्चिम बंगाल या भागात बिरसा मुंडा यांना क्रांतीसूर्य मानले जाते. १५ नोव्हेंबरला बिरसा मुंडा यांची जयंती आदिवासी बांधव साजरी करतात. आदिवासी समाजात जन्माला येऊनसुद्धा त्यांनी महान असे कार्य केले. म्हणूनच त्यांचे आजही स्मरण केले जाते. (साभार : इंटरनेट)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# हार्ट अटॅक येऊ नये असे वाटत असेल तर या गोष्टी करा

डायबिटीस असलेल्या व्यक्तींसाठी औषधोपचाराबरोबरच योग्य आहार घेणेदेखील तितकेच गरजेचे असते. त्यांनी संतुलित आणि कमी ग्लायसेमिक इंडेक्स असलेले अन्नपदार्थ, फायबर, प्रथिने आणि गुड फॅटस असलेले पदार्थ सकाळच्या नाश्त्यात समाविष्ट केल्यास रक्तातील साखर नियंत्रणात राहते आणि दिवसभर शरीरात ऊर्जा टिकून राहते. डॉ. भाग्येश कुलकर्णी यांनी आपल्या इंस्टाग्राम अकाउंटवरुन डायबिटीस असणाऱ्यांसाठी उत्तम नाश्त्याचे पदार्थ कोणते आहेत, याबद्दल अधिक माहिती देणारा व्हिडिओ शेअर केला आहे.



मोड आलेली कडधान्ये हलकीशी उकडवून त्यात बारीक चिरलेला कांदा, टोमॅटो, कोथिंबीर करून वर थोडासा चाट मसाला भुरभुरवून घालावा. तो हलका, प्रथिनयुक्त आणि कमी ग्लायसेमिक इंडेक्स असलेला असावा.

बेसन पीठ किंवा इतर वेगवेगळ्या प्रकारची पौष्टिक पीठ एकत्रित घेऊन आपण त्यापासून चिला किंवा धिरडं तयार करून खाऊ शकतो.

सकाळचा नाश्ता असा असावा जो पचायला हलका, पोषणमूल्यांनी समृद्ध आणि रक्तातील साखर नियंत्रणात ठेवणारा असेल. हिरवे मूग देखील डायबिटीस असलेल्या व्यक्तींसाठी तितकेच पौष्टीक असतात. आपण हिरव्या मुगाचा पौष्टीक डोसादेखील सकाळच्या नाश्त्यात खाऊ शकतो.

गरमागरम थालीपीठदेखील एक उत्तम पर्याय ठरु शकतो. नाचणी, ज्वारी, बाजरी, हरभरा पीठ अशा मिश्र धान्यांपासून बनवलेले थालीपीठ हळूहळू पचते, त्यामुळे रक्तातील साखरेत झपाट्याने वाढ होत नाही. मिश्र धान्यांमध्ये नैसर्गिक फायबर आणि प्रथिनांचे प्रमाण जास्त असल्याने पचनक्रिया सुधारते आणि पोट अधिक वेळासाठी भरलेले वाटते.

फ्रुटस आणि ड्रायफ्रुटसदेखील डायबिटीस असलेल्या व्यक्ती सकाळच्या नाश्त्यात खाऊ शकतात. हे पदार्थ खाल्ल्यास शरीराला नैसर्गिक साखर, फायबर, अँटीऑक्सिडंट्स आणि गुड फॅट्सचा पुरवठा होतो. डायबिटीस असलेल्या व्यक्तींच्या आहारात फळं आणि ड्रायफ्रुट्स यांचा योग्य प्रमाणात समावेश केल्यास हा नाश्ता पोषणमूल्यांनी भरलेला, ऊर्जादायी ठरतो.

सकाळच्या नाश्त्यात सोया किंवा टोफू यांसारख्या पौष्टिक पदार्थांचा समावेश करावा. यामध्ये प्रथिनांचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात ठेवण्यास मदत होते.

# खोपोलीत दरड कोसळण्याची भीती

## ३००० रहिवाशांची वस्ती जीवन-मृत्यूच्या सीमारेषेवर





### आपत्कालीन स्थितीबाबत सराव

***मे महिन्यात कोसळलेल्या मुसळधार मान्सूनपूर्व पावसामुळे काजू वाडी येथील मोठा भाग खचून माती व दगड खाली रस्त्यावर आल्यावर प्रशासन जागे झाले आहे. या पार्श्वभूमीवर सुभाष नगर या दरडग्रस्त भागातील रहिवाशांना आपत्कालीन स्थितीचा सामना करण्यासाठी ठराव व्हावा यासाठी विशेष मॉकड्रिल करण्यात आले. या मॉकड्रिलला तालुक्यातील सर्वच विभागांनी सहभागी होऊन आपत्कालीन स्थिती बाबत सराव व प्रशिक्षण घेतले.***

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीतील दरडग्रस्त रहिवासी भाग म्हणून जाहीर असलेल्या व धोकादायक घोषित करण्यात आलेल्या सुभाष नगर, काजूवाडी, यशवंत नगर येथे प्रत्येक मान्सून काळातील चार महिने भीतीचे वातावरण याही वर्षी कायम असणार आहे. मुसळधार पाऊस सुरु असला की, खोपोलीतील दरड कोसळण्याची भीती असलेल्या या रहिवासी भागातील नागरिकांची झोप उडते .कोणता दिवस व कोणती रात्र कोणते संकट व काय घेऊन येईल या भीतीने येथील नागरिक चिंताग्रस्त असतात.

माळीण ची दुर्घटना नंतर खोपोलीतील दरडग्रस्त भागाचे भूगर्भ सर्वेक्षण व तांत्रिक विभागाकडून सर्वेक्षण करण्यात आले आहे . या सर्वेक्षण अहवाल नुसार, खोपोलीतील काजूवाडी , सुभाष नगर, यशवंतनगर, वर्धमान नगर आदी रहिवासी भागाला दरडीचा धोका वर्तविण्यात आलेला आहे. तसेच काही उपयोजना ही सुचविण्यात आलेल्या आहेत. यात अति धोकेदायक घरांचे सुरक्षित ठिकाणी पुनर्वसन करणे, वस्ती व डोंगर यांच्या मध्ये मजबूत संरक्षक भिंत उभारणे, सुरक्षा जाळी बसविणे, सदर परिसरात माती उत्तखलन पूर्णपणे बंद करून नवीन बांधकामास परवानगी देतांना पूर्ण सर्वेक्षण करून व उपयुक्त अटी व शर्ती नुसारच परवाना देणे आदी बाबींचा समावेश होता.

मागील आठ वर्षात या अहवालातील कोणत्याही उपाययोजना खोपोली नगरपालिका व महसूल विभागाने पूर्ण केलेल्या नाहीत असे चित्र आहे. आजही धोकेदायक ठिकाणी माती उत्तखलन होऊन, अनियंत्रित नवीन बांधकामे सुरू आहेत. यावर नगरपालिका व महसूल विभागाने कोणतेही नियंत्रण मिळविलेले नाही. संरक्षक भिंत बांधण्यासाठी नगरपालिका कडून पुढाकार घेण्यात आला, मात्र याही बाबतीत कामे अपूर्ण अवस्थेत आहेत.

मागील वर्षी जूनच्या शेवटच्या आठवड्यात पडलेल्या पहिल्या पावसात येथील वर्धापन नगर परिसरातील कमला रेसिडनशी या मोठ्या रहिवासी संकुलात मोठी दरड व मोठं मोठे दगड कोसळले.सुदैवाने यात कोणतीही जिवीत हानी झाली नाही .याच दरम्यान मोगलवाडी भागात डोंगरावरील माती व दगड रहिवासी घरावर आल्याने घर कोसळण्याची घटना घडली. यात आर्थिक नुकसान झाले, पण सुदैवाने जिवीत हानी मात्र टळली होती.

मुसळधार पाऊस सुरू असल्यावर पाण्याच्या प्रवाह बरोबर मोठ्या प्रमाणात माती व दगडी रहिवासी भागात येण्याच्या घटना येथे नित्याच्या आहेत. याही वर्षी मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पडलेल्या मुसळधार मान्सून पूर्व पावसामुळे काजूवाडी डोंगराचा मोठा भाग खचला व मोती आणि दगड रस्त्यावर आल्याची घटना घडली आहे. या घटनेनंतर तहसीलदार अभय चव्हाण, मुख्याधिकारी डॉ पंकज पाटील यांनी या रहिवासी भागाची पाहणी करून काही उपाययोजना तातडीने राबविण्यात येतील, असे सांगितले होते.

पाऊसाला सुरुवात झाली आणि मुसळधार पाऊस कोसळत असेल तर खोपोलीतील या दरडग्रस्त भागातील नागरिकांची झोप उडते . कोणता दिवस काय घेऊन येईल व कोणती रात्र काळरात्र ठरेल याचा नियम नसल्याने या भागातील जवळपास सातशे -आठशे कुटुंबातील ३००० ते ३२०० रहिवासी चिंताक्रांत व भयभीत असतात. दरवर्षी दरडी कोसळतात, नुकसान होते. पंचनामा ही होतो. नव्याने या समस्ये बाबत वरिष्ठ अधिकारी, शासकीय यंत्रणा, सार्वजनिक ठिकाणापासून ते नगरपालिका स्तरावर सर्वत्र चर्चा होते, मात्र त्या नंतर पाऊस थांबला की, पुन्हा सगळे सर्व विसरतात. झालेले ठराव, सुचविण्यात आलेल्या उपाययोजना पुन्हा पुढील एक वर्षासाठी लालफितीत अडकतात. मागील वर्षी इरशालवाडीच्या दुर्दैवी घटने नंतर त राज्य सरकार, जिल्हा महसूल विभाग स्थानिक प्रशासन व पालिकेचे डोळे उघडतील व सुभाष नगर, काजूवाडी, यशवंत नगर सह खोपोली शहरातील अन्य दरड ग्रस्त भागांसाठी ठोस उपाययोजना केल्या जातील हा आशावाद निर्माण झाला होता, मात्र या नंतरही कोणतेही भरीव कामकाज येथे झालेले नाही.

# तिथीप्रमाणे होणाऱ्या शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याची जोरदार तयारी

## मंत्री गोगावले यांनी केली रायगडावर पाहणी



**महाड : प्रतिनिधी**

येत्या नऊ तारखेला तिथीप्रमाणे किल्ले रायगडावर शिवराज्याभिषेक मोठ्या उत्साहात व लाखो शिवभक्तांच्या उपस्थित साजरा होणार असून यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री सह बहुतांश मंत्रिमंडळ उपस्थित राहणार आहे. या कार्यक्रमाच्या आढावा पाहणीसाठी मंत्री भरत गोगावले यांनी किल्ले रायगड येथे पाहणी केली.

सोमवार दिनांक ९ जून रोजी दुर्गराज रायगडावर तिथीप्रमाणे शिवराज्याभिषेक सोहळा साजरा होणार असून या वेळी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ना. उदय सामंत, अदिती तटकरे सह अनेक मंत्री आमदार उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे नियोजन मंत्री भरत गोगावले यांच्या मार्गदर्शनाखाली कोकण कडा मित्रमंडळ व श्री शिवराज्य भिषेक दिनोत्सव समिती करीत आहे. दरम्यान, कार्यक्रमाच्या नियोजन, तयारीच्या पाहणीसाठी मंत्री महोदय किल्ले रायगड येथे आले असता या वेळी त्यांनी केली ३२ वर्षे तिथीप्रमाणे शिवराज्याभिषेक साजरा होत असून यापुढेदेखील अखंडितपणे हा शहराध्यक्ष साजरा होत राहणार, असा विश्वास भोगावले यांनी व्यक्त केला.

दरम्यान, तारखेप्रमाणे शिवराज्याभिषेक झाल्यानंतर यावर आज राज्याचे रोजगार हमी योजना फलोत्पादन आणि खारभूमी विकास मंत्री शिवभक्त आमदार नामदार भरत गोगावले यांनी प्रतिक्रिया दिली असून छत्रपती शिवरायांचा राज्याभिषेक सोहळा हा आम्ही मोजक्या शिवभक्तांसह ३२ वर्षांपूर्वी सुरू केला आहे नंतर याच राज्याभिषेक सोहळ्याला संभाजी महाराज छत्रपती यांना निमंत्रित केले होते, मात्र काही वर्षानंतर छत्रपती संभाजी यांनी हा राज्याभिषेक सोहळा तारखेप्रमाणे करण्यात यावा अशी मागणी केली होती, मात्र हिंदू धर्मातील सणवार हे तिथीप्रमाणे साजरे केले जातात त्यामुळे आपण राज्याभिषेक तिथीप्रमाणेच करावा, असे सांगण्यात आले, मात्र छत्रपतींनी राज्याभिषेक सोहळा तारखेप्रमाणे साजरा करण्यास सुरुवात केली. आज दोन्ही राज्याभिषेक सोहळ्यांना संपूर्ण महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात शिवभक्त येत आहेत आणि तारखेप्रमाणे होत असणाऱ्या राज्याभिषेक सोहळ्यालादेखील शासन सर्वतोपरी मदत करत आहे. त्यामुळे राज्याभिषेक सोहळा एक करावा ही मनोज जरांगे पाटील यांनी केलेली मागणी मंत्री भरतशेठ गोगावले यांनी एक प्रकारे मोडीत काढली आहे. तर छत्रपतींचे दोन्ही राज्याभिषेक सोहळे झाल्यास आम्हाला कोणतीही हरकत नाही, असे देखील मंत्री भरत गोगावले यांनी सांगितले आहे.

छत्रपती शिवरायांची राजसदर ही युती सरकारमध्येच शासनामार्फतच बांधली जाईल आणि त्याच्यासाठी शासन कटीबद्ध आहे त्यासाठी पुरातत्व विभागाकडे आम्ही जाऊन ज्या अडीअडचणी असतील त्या दूर करण्याचा प्रयत्न करू, असे मंत्री भरतशेठ गोगावले यांनी सांगितले असून ९ जुनला तिथीप्रमाणे साजरा होणाऱ्या राज्याभिषेक सोहळ्याला संपूर्ण महाराष्ट्रातुन मोठ्या संख्येने शिवभक्तांनी आपली उपस्थिती दर्शवावी, असे आवाहनदेखील केले आहे.

# सुधागडातील ताडगाव येथे आरोग्य शिबिर

**पाली : प्रतिनिधी**

ताडगाव ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांसाठी रा.जि.प शाळा ताडगाव येथे नुकतेच महा आरोग्य शिबिर घेण्यात आले. यावेळी अनेक जणांना मोफत आयुष्मान भारत कार्ड व आभा कार्ड काढून देण्यात आले. तसेच आजारानुसार मोफत औषधेदेखील वाटण्यात आली.




या शिबिराचे आयोजन शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष अध्यक्ष महेश नारायण दळवी व ग्रामपंचायत ताडगाव सरपंच करुणा भिमचंद्र साठे आणि TKDK परिसर विकास संघर्ष समिती यांच्यामार्फत करण्यात आले होते. या आरोग्य शिबिरात तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत मोफत ईसीजी, रक्तदाब, ब्लड शुगर, ऑक्सिजन लेव्हल व हृदयविकार आदी तपासण्या करण्यात आल्या.

या शिबिरामध्ये ८० लोकांनी लाभ घेतला. त्यामधील काही लोकांना हृदयविकार समस्या असल्याचे निदान करण्यात आले. या रुग्णांच्या नातेवाईकांसोबत बोलून त्यांना लवकर मुंबईमधील चांगल्या हॉस्पिटलमध्ये त्यांचे मोफत उपचार करणार आहोत. असे सामाजिक कार्यकर्ते सचिन साठे यांनी सांगितले.

शिबिरासाठी डॉ. समीर गोपाल लाड, डॉ.राहुल सुरेश चौधरी, केअर १ हॉस्पिटल, आर. आर हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर डोंबिवली, स्वरदिव्य फाऊंडेशन यांनी शिबिरासाठी सहकार्य व योगदान दिले.

या महाआरोग्य शिबिराला रवींद्र देशमुख, राजेंद्र राऊत, संजय म्हात्रे, शिवराम पवार, मंगेश पालांडे, मनोज भोई, मयूर कारखानीस, अनंत पाठारे, महेश कालेकर, मनोज भोईर व प्रतीक पवार यांनी आपली उपस्थिती दाखवली.

तालुक्यामध्ये कोणालाही कुठलाही मोठा आजार असेल तर थेट महेश दळवी ९००४६०३२९८ यांच्याशी संपर्क साधावा, त्यांना चांगल्या हॉस्पिटलमध्ये मोफत उपचार करून दिले जातील, असे महेश दळवी यांनी सांगितले.

# शिक्षण म्हणजे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र -आमदार महेंद्र थोरवे

**कर्जत : प्रतिनिधी**

'शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे, असे प्रतिपादन आमदार महेंद्र थोरवे यांनी केले. आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशन, छत्रपती शिवाजी महाराज युनिव्हर्सिटी आणि सेंट विल्फ्रेड ग्रुप ऑफ कॉलेजेस पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने कर्जत तालुक्यातील शिवतीर्थ, पोसरी येथे दहावी व बारावीच्या परीक्षेत उत्तम यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा झाला.



समारंभाचे प्रमुख वक्ते प्रा. विजय नवले यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी माजी नगरसेवक ॲड. संकेत भासे, अभिषेक सुर्वे, प्रसाद थोरवे, गटशिक्षणाधिकारी खैरे, प्रा. सिद्धेश खानविलकर, प्रा. राकेश जुन्नरकर, प्रा. आप्पा बनसोडे, डॉ. कल्पना दाभाडे, प्रा. प्रीती बन्सल, डॉ. अनिरुद्ध साखरे, डॉ. राजू थोरवे आदी उपस्थित होते. ॲड. संकेत भासे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. तीन गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

सूत्रसंचालन अभिषेक सुर्वे यांनी केले. महेंद्र थोरवे फाउंडेशनचे पदाधिकारी व कार्यकर्ते, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

# पेण महावितरणतर्फे सुरक्षा सप्ताहनिमित्त जनजागृती रॅली



**पेण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र महावितरणच्या २०व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यभरात सुरक्षा सप्ताह राबवण्यात आले. यानिमित पेण विद्युत महामंडळाच्या वतीने अधिक्षक अभियंता धनराज बिक्कड यांच्या मार्गदर्शनाखाली पेणमध्ये रॅली काढून विद्युत सुरक्षाविषयी जनजागृती करण्यात आली.

या वेळी रॅलीत कार्यकारी अभियंता श्री. चव्हाण, उपकार्यकारी अभियंता सिद्धार्थ खोब्रागडे, सहाय्यक अभियंता संजय शिंदे (पेण ग्रामीण), चेतन पाचपांडे (वडखळ), योगेश देसाई (पांडापूर), प्रशांत साळुंखे (वाशी), संतोष पवार (जिते) आदींसह कर्मचारी सामील झाले होते. ही रॅली अंतोरा फाटा, राजू पोटे मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, महावीर मार्ग, खाटीक आळी, मार्गे पुन्हा पेण विद्युत कार्यालय येथे नेऊन रॅलीची सांगता करण्यात आली.

या वेळी विद्युत सुरक्षा विषयी मार्गदर्शन करताना अधिक्षक अभियंता धनराज बीक्कड यांनी सांगितले की, ग्राहकाने गो ग्रीन संकल्पना अमलात आणून आपली बिले ऑनलाईन पद्धतीने भरणे गरजेचे असून त्यामुळे झाडांची होणारी कत्तल कमी होईल, तसेच जुन्या विद्युत उपकरणे वापरताना विशेष काळजी घेणे गरजेचे आहे असे ते म्हणाले. या वेळी सर्व कर्मचाऱ्यांना वीज सुरक्षेची शपथ देण्यात आली.

# माणगाव तालुका नाभिक तरुण संघ कार्यकारिणीची निवड

**माणगाव : प्रतिनिधी**

शनिवारी रायगड जिल्हा विश्वस्त श्री.भाऊसाहेब पाडे यांच्या निवासस्थानी, माणगाव तालुका नाभिक तरुण संघटनेची सभा सामाजिक कार्यकर्ते नितीन बडे, यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाली. या सभेत माणगाव तालुका तालुका नाभिक तरुण संघ कार्यकारिणीची निवड करण्यात आली.



यामध्ये अध्यक्ष नितीन ल. बडे, उपाध्यक्ष विलास वसंत यादव, अजित हुजरे, कार्याध्यक्ष सुरेश चव्हाण, सचिव राजेंद्र जाधव, सहसचिव विजय भोसले, खजिनदार गणेश पवार, सल्लागार सौरभ पाडे, प्रदिप कदम, सुरेश यादव, दिपक चव्हाण, बळीराम पवार, गणेश दिवेकर, भरत जाधव, कार्यकारिणी सदस्य, समिर मोहिते, अभिषेक खंडागळे, अमोल जाधव, दिपेश जाधव, अशोक यादव, उदय चव्हाण, सिताराम भोसले, प्रल्हाद बडे, रूपेश गायकवाड, संतोष भोसले, निशांत चव्हाण यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

माणगाव तालुक्यातुन रायगड जिल्हा नाभिक तरुण संघ, जिल्हा कमिटी करिता कार्यकारिणी सदस्य, बापुसाहेब सोनगीर, सुरेंद्र पालांडे, कांता हुजरे, सुरेश यादव, दिलीप जाधव, मंगेश बडे, जयंत शिंदे, यांची निवड करण्यात आली. या वेळी दिलीप जाधव, समिर मोहिते, सुहास शिंदे, संदीप शिंदे, शुभम काशिद, चेतन मोहिते, दिपक चव्हाण, आदी समाज बांधव उपस्थित होते.

## नऊ लाखांच्या भंगाराची चोरी

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यातील वावोशी गावचे हददीत होराळे येथील नेमको कारखान्यात मध्ये ८लाख ९२हजार २४०रुपये किंमतीचा सुमारे २३ हजार ४८० किलोग्रॅम वजनाचे भंगार (स्क्रॅप) माल चोरीला गेल्याची घटना घडली आहे.

नेमको कारखान्यात वजन काटा काम करणारे याचेपैकी कोणीतरी कर्मचारी, माल वाहतुक करणारे ट्रान्सपोर्टर, दष्टी एंटरप्रायझेस यांनी आपसात संगनमत करुन मागील पाच महिन्यात भंगार मालाचा अपहार केला. याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई एस बहाडकर हे करीत आहेत.

# माणगावमध्ये आज सीबीएसई शाळेचे उद्घाटन

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत होणार सोहळा

**माणगाव : बातमीदार**

माणगाव येथील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा उद्घाटन सोहळा सोमवारी (दि.९) दुपारी १ वाजता राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. हा सोहळा माणगाव शहरातील गणेश नगर, निजामपूर रोड येथील अमित कॉम्प्लेक्स समोरील मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या विस्तीर्ण पटांगणात संपन्न होणार असून या कार्यक्रमाची जय्यत तयारी झाली आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.



या उद्घाटन सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार सुनील तटकरे, भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, उद्योग मंत्री उदय सामंत, रोजगार हमी योजना आणि फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, गृहराज्यमंत्री योगेश कदम, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार श्रीरंग बारणे, धैर्यशील पाटील, आमदार महेंद्र दळवी, महेंद्र थोरवे, रविंद्र पाटील, प्रशांत ठाकूर, निरंजन डावखरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

माणगाव शहरात सीबीएसई इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू होत असल्याने येथील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गैरसोय दूर होणार आहे. माणगाव शहरातील अनेक पालकांच्या मागणीनुसार संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांनी पालक आणि विद्यार्थी यांची मागणी पूर्ण केली आहे. या शाळेत अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित करुन सर्व अद्ययावत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. वातानुकूलित आणि डिजिटल वर्ग खोल्या तयार करण्यात आल्या आहेत. माहिती आणि तंत्रज्ञान, संगीत, प्रयोगशाळा, प्रशस्त आणि विस्तीर्ण मैदान, मल्टिपर्पज हॉल, ए.सी. बस सेवा आदी सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे जलतरण तलाव लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या शाळेत माणगाव सहीत तालुक्यातील इंदापूर, निजामपूर, लोणेरे, मोरबा, खरवली, गांगवली या विभागातील सुमारे २०० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. या शाळेत अनुभवी आणि पदवीधर शिक्षक वृंद असल्याने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी प्रयत्न केले जात आहेत. तसेच भविष्यात आव्हानात्मक स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होण्यासाठी गुणवत्ता धारक विद्यार्थी घडविण्यासाठी शैक्षणिक आणि कृतीशील उपक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे पालक आणि विद्यार्थी अत्यंत समाधानी आहेत अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांनी दिली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई इंग्रजी माध्यमाच्या शाळेला नांव देण्यात आले आहे. या शाळेची इमारत एका वर्षातच पुर्ण करण्यात आली आहे. केंद्र आणि राज्य सरकार यांच्या नियमानुसार आणि सर्व प्रकारच्या अटी आणि शर्ती पाळत या इमारतीचे बांधकाम वेळेत पूर्ण केले आहे. या इमारतीच्या उद्घाटन सोहळ्याची जोरदार तयारी झाली असून उपमुख्यमंत्री, खासदार, मंत्री आणि आमदार यांच्या स्वागतासाठी ठिकठिकाणी कमानी, फलक लावण्यात आले आहेत.

# स्वच्छता मोहिमेत १६० गोणी कचरा गोळा

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त करावे डोलाया खाडीकिनारी मोहीम



**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदूषणाचे निर्मूलन या संकल्पनेनुसार यावर्षीचा जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. या अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शासन आदेशानुसार नागरिकांमध्ये जनजागृती, स्वच्छता मोहीमा, पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अंगिकार तसेच कार्यशाळा आयोजन अशा विविध विषयांवर उपक्रम आयोजित करण्यात आले.

या अंतर्गत जागतिक पर्यावरण दिनी संध्याकाळी करावे येथील डोलाया खाडी किनारी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली व उपस्थितीत विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये विशेषत्वाने प्लास्टिक कचरा गोळा करण्यावर भर देण्यात येऊन १६० गोणी प्लास्टिक बॉटल्स, पिशव्या, रॅपर्स आणि तत्सम कचरा गोळा करण्यात आला.

या स्वच्छता मोहीमेच्या आयोजनात हेंकेल कंपनीने पुढाकार घेतला असून त्यासोबत नेक्सस मॉल सीवूड, माता अमृतानंदमयी मठ तसेच एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी महापालिका अधिकारी, कर्मचारी व स्वच्छतामित्रांसह सक्रिय सहभाग घेतला.

या मोहीमेमध्ये नवी मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, परिमंडळ १ उपायुक्त श्री. सोमनाथ पोटरे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ.अजय गडदे, बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ.अमोल पालवे, मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे, स्वच्छता अधिकारी नरेश अंधेर साहेब तसेच हेंकेल कंपनीचे साऊथ एशिया रिजन इन्फ्रास्ट्रक्चर हेड भूपेश सिंग, सूर्योदय बँकचे पणन वरिष्ठ व्यवस्थापक प्रसाद साखरकर आणि सर्वच संस्थांचे अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते. याप्रसंगी उपस्थितांनी माझी वसुंधरा अभियानाची सामुहिक शपथ ग्रहण केली.

# ऐरोली येथे अनधिकृत झोपड्यांविरोधात कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली अंतर्गत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचे निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या नियंत्रणाखाली, अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड यांच्या माध्यमातून ऐरोली विभागाचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी यांनी अतिक्रमण विरोधी धडक मोहीम राबविली.

यामध्ये ऐरोली सेक्टर-१९ येथील नवी मुंबई महानगरपालिकेच्या भूखंड क्र.७४ वर उभारण्यात आलेल्या ४२ अनधिकृत झोपड्या कारवाई करून निष्कासित करण्यात आल्या. या धडक मोहिमेत ०१ जेसीबी, ०१ डंपर, १९ मजूर व ०१ मुकादम यांचा वापर करण्यात आलेला असून सदर मोहिमेकरीता नमुंमपा अतिक्रमण विभागाचे पोलीस अधिकारी / कर्मचारी तसेच स्थानिक रबाळे पोलीस स्टेशन यांचे अधिकारी / कर्मचारी यांचा बंदोबस्त होता.

यासोबतच जी विभाग कार्यालय, ऐरोली येथील अतिक्रमण विभागातील अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते. यापुढील काळात अशा प्रकारची अतिक्रमण विरोधी कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार आहे.



# मार्केट्समध्ये कापडी पिशवी वेंडींग मशीन



**नवी मुंबई : बातमीदार**

'प्लास्टिक पिशव्यांना द्या नकार, कापडी पिशव्यांचा करा स्वीकार'- अशी जनजागृती करण्यासोबतच त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने नागरिक मार्केटमध्ये खरेदी करण्यासाठी गेल्यानंतर सामान ठेवण्यासाठी त्यांच्याकडे पिशवी नसेल तर त्यांना कापडी पिशवी तेथेच उपलब्ध व्हावी अशा प्रकारची सुविधा नवी मुंबई महापालिकेच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येत आहे.

याकरिता महानगरपालिकेच्या मार्केट्समध्ये कापडी पिशवी वेंडींग मशीन लावण्यात येत असून सेक्टर ९ सीबीडी बेलापूर येथील कापडी पिशवी वेंडीग मशीन उपक्रमाचा शुभारंभ जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नमुंमपा अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या हस्ते झाला. या वेळी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे, बेलापूर विभागाचे सहा. आयुक्त डॉ.अमोल पालवे उपस्थित होते.

यावर्षी जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना 'प्लास्टिक प्रदूषणाचे निर्मूलन' ही असून त्यादृष्टीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई प्लास्टिकमुक्त करण्याचा निर्धार करीत विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून मार्केटमध्ये कापडी पिशव्यांचे वेंडींग मशीन लावून नागरिकांना कापडी पिशव्या वापरण्याची सवय लावण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

नवी मुंबई शहर स्वच्छतेमध्ये नेहमीच आघाडीवर राहिले असून पर्यावरण संवर्धनाबाबतही नवी मुंबईकर नेहमीच जागरूक असतात. त्यामुळे महानगरपालिकेने हाती घेतलेले प्लास्टिकमुक्त नवी मुंबईचे उद्दिष्ट साकारण्यासाठी सर्व नवी मुंबईकर नागरिक आपले संपूर्ण योगदान देतील असा विश्वास व्यक्त करीत अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी लवकरच महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मार्केटमध्ये अशा प्रकारच्या कापडी पिशव्या वेंडींग मशीन लावण्यात येतील, असे उपस्थित नागरिकांशी संवाद साधताना सांगितले.

# पर्यावरणदिनी दिवाळे कोळीवाड्यात वृक्षारोपण



**नवी मुंबई : बातमीदार**

पर्यावरण आणि त्याचे संवर्धन ही काळाची गरज असून, वाढते प्रदूषण, वृक्षतोड आणि शहरीकरणाच्या रेट्यात हरवलेले झरे, ओढे-नाले आणि गमावलेली स्वच्छ हवा यांचे महत्त्व अधोरेखित करणारे संदेश देत दिवाळे कोळीवाड्यातील अजिंक्य मच्छिमार सहकारी संस्था व दिवाळे ग्रामस्थांच्या वतीने शुक्रवारी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून, वृक्षारोपण आणि जनजागृती असे उपक्रम राबवून जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.


वर्षातील जवळपास १० महिने खोल समुद्रात मासेमारीसाठी जाणारा कोळीबांधव पावसाळी वादळी वाऱ्यात मासेमारी दोन महिने बंद असल्याने या काळात वृक्षारोपण, खाडी परिसरातील स्वच्छता, सागरी सुरक्षा व्यवस्था, आरोग्य शिबीर अशा विविध शिबिराचं आयोजन करून मार्गदर्शन केले जाते. या वर्षी देखील अजिंक्य मच्छिमार सहकारी संस्थेच्या माध्यमातून वृक्ष लागवड करून त्याची निगा राखण्याची जबाबदारी निश्चित केली आहे.

वाढत्या औद्योगीकरणामुळे दिवसेंदिवस पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. त्यात अवकाळी पाऊस, हवामानातील बदल, तापमानात वाढ होऊन अनेक पशुपक्षांचे अस्तित्व नाहीसे होणे हे आता दिसून येत आहेत. भविष्यकाळात पुढील पिढी सुखाने जगू द्यायची असेल तर पर्यावरण समृद्ध करण्यासाठी मोठी मेहनत करावी लागणार आहे. निसर्ग समृद्ध तर मानवी जीवन समृद्ध! भविष्यात प्राणवायूमुळे कोणाचा जीव गमवावा असे वाटत नसेल तर निसर्गाची समृद्धता टिकवण्यासाठी प्रत्येक वर्षी वृक्षारोपण व संवर्धन होणे काळाची गरज आहे.

दरम्यान, निसर्ग मानवाला खूप काही देत असतो याची जाण ठेवून, निसर्गाचं आपल्याला देणं आहे या कृतज्ञतेच्या भावनेतून प्रत्येक नागरिकाने पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी आपापल्या क्षेत्रात वृक्षारोपण करून किमान एक तरी झाड लावावे, असे आवाहन अजिंक्य सामाजिक संस्थेचे अध्यक्ष निलेश कोळी यांनी सांगितले.

या वेळी, गणेश पाटील, किशोर कोळी, वसंत टिपू, प्रेमनाथ कोळी, सुनील बाये, वासुदेव कोळी, भाग्यवान कोळी, नरेश हिंडे, राजू कोळी, गजानन कोळी, संदीप कोळी, नितीन कोळी, सचिन कोळी यांच्यासह दिवाळे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेल परिसरातील बाजारपेठेत रानभाज्यांची आवक वाढली



**पनवेल : वार्ताहर**

पावसाळा सुरू झाला की कधीही दिसणाऱ्या रानमेव्याने पावसाळ्यात मार्केट फुलून जाते. कुडू, टाकळा, शेवळे, भारंग, तेलपाट, ससेकांद अशा पाहुणेमंडळींनी सध्या भाजीमार्केट फुलून गेलाय. अनेकांनी तर यातील काही नावं ऐकलीही नसतील. पण हा आहे पावसाळ्यातला रानमेवा. फक्त पावसाच्या पाण्यावर फुलणारा अत्यंस सकस आणि पौष्टीक असा रानमेवा पनवेलमध्ये दाखल झाला आहे.

या सगळ्या पालेभाज्या पाहून नॉनव्हेजीटेरीयन्स जरा खडू होतील पण त्यांच्यासाठीही पावसाळ्यात मार्केटमध्ये खुप चॉईस आहे. ऐन पावसाळ्यात येणाऱ्या या करंदा, अळू, हिरवे बिरडे, आळंबी, कुड्याच्या शेंगा, कुवली, बांबूचे कोंब यांची आवक बाजारात वाढली आहे कोणत्याही रासायनिक खता-औषधांशीवाय जंगलात रूजत असल्यामुळे हा रानमेवा खूपच चविष्ट आणि तितकाच पौष्टीक असतो.

पनवेल तालुक्यामधील बाजारात काही प्रमाणात रानभाज्या विक्रीसाठी यायला सुरुवात झाली आहे. या रानभाज्यामध्ये औषधी गुणधर्म असल्याने व रासायनिक विद्राव्यापासून मुक्त असणाऱ्या या रानभाज्या असल्याने त्यांची मोठ्या प्रमाणात विक्री होते. पावसाळा सुरू झाला की, पनवेल तालुक्यात आदिवासी भागातील डोंगरकपारी व घनदाट जंगलात राहणारा आदिवासी समाज आपल्या परिसरातील निरनिराळ्या रानभाज्या विक्रीसाठी शहरी भागात व तालुक्याच्या ठिकाणी घेऊन येत असतो. सध्या कर्टोली ही १६० रुपये किलोने विकण्यात येत आहे. व बाकीच्या भाज्या ह्या वाट्याने दिल्या जातात.

कटॉली ही भाजी सध्या अनेक बागांमध्ये पिकवली जाते पण आदिवासी भागात दऱ्याखोऱ्यात पिकवलेल्या कर्टोली या भाजीला फार मोठी मागणी आहे. या सर्व भाज्या औषधी असल्यामुळे नागरिकांचा सर्वाधिक कल या भाज्या खरेदी करण्याकडे असतो. पनवेल तालुक्यात बहुतांश ठिकाणी पावसाच्या हलक्या सरींची बरसात झाली असून रानावनात झाडाझुडपांना, वेलींना पालवी फुटू लागली आहे. अशा वातावरणात बाजारात रानभाज्यांची आवक वाढली असून औषधोपयोगी म्हणून ग्राहकांकडून पसंती मिळत आहे. पावसाळा सुरू होताच रानभाज्यांना बहर येतो.



पनवेल : भाजपचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील यांना वाढदिवसानिमित्त सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. सोबत आमदार विक्रांत पाटील.

# बसेसच्या दुर्घटनेबाबत संबंधितांना नोटीस

**नवी मुंबई : बातमीदार**

घणसोली आगारात नमुंमपा परिवहन उपक्रमाच्या मालकीच्या (मे.जे.बी.एम.मेक) इलेक्ट्रिक बसला आग लागली. या आगीमुळे त्याच्या बाजूस उभ्या असलेल्या तीन बसेसचे आगीत मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्या दिवशी मार्ग क्र.१४४ वर कार्यरत असलेली (मे. जे.बी.एम. मेक) इलेक्ट्रिक बस ही मरोळ बसस्थानक, अंधेरी पूर्व येथे सायंकाळच्या दरम्यान आग लागून पूर्णपणे जळून खाक झाली.

नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या ताफ्यात सद्यस्थितीत जेबीएमच्या इलेक्ट्रिक वातानुकूलित स्वमालकीच्या ३० बसेस तसेच जीसीसी तत्वावरील १६५ बसेस कार्यरत आहेत.

बसेसची नियमित दुरूस्ती करण्याची व सुट्ट्या भागांसह जबाबदारी मूळ उत्पादक व पुरवठादार मे एम. एच इको लाईफ तथा जे.बी.एम यांची आहे. यास्तव भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याची दक्षता घेण्याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश देवून केंद्र शासनाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या सीआयआरटी या संस्थमार्फत परिवहन उपक्रमाच्या बस ताफ्यातील मे. जे.बी.एम. मेक सर्व बसेसचे तृतीय संस्थेकडून ऑडिट करून घेण्याबाबत आदेश दिलेले आहेत. तसेच उपरोक्त बसेसला लागलेल्या आगीसंदर्भात मूळ उत्पादक व पुरवठादार यांना नोटीस देण्यात आल्या असून त्याचा अहवाल सात दिवसाच्या आत देण्याबाबत परिवहन व्यवस्थापक यांनी निर्देश दिले आहेत.

# दिवाळे गावातील मासळी-भाजी स्वच्छतागृहाचे लोकार्पण

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

नवी मुंबईतील दिवाळे-कोळीवाड्यातील मासळी व भाजी विक्रेत्यांकरीता आमदार मंदा म्हात्रे यांच्या आमदार निधीतून रु. २१ लाख खर्च करून निर्माण करण्यात आलेल्या सुसज्ज स्वच्छतागृहाचे लोकार्पण ज्येष्ठ नागरिक घनश्याम कोळी यांच्या हस्ते संपन्न झाले.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या की, दिवाळे ग्रामस्थांसाठी सार्वजनिक मूलभूत सोयी-सुविधासह सोलर हायमास्ट, आधुनिक जेट्टी, ज्येष्ठसाठी विरंगुळा केंद्र अशा सुविधा उपलब्ध केल्या आहेत. शहराचा विकासा बरोबर स्थानिक मूळ गावांचा विकास होऊन नागरिकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी मी सतत पर्ययत्नशील आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्मार्ट व्हिलेजचे स्वप्न मी साकारीत असून दिवाळे गाव हे पहिले पाऊल आहे असे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.



यावेळी खांदेवाले मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष रमेश हिंडे, गंगेश कोळी, भाग्यवान कोळी, संतोष कोळी, ज्ञानेश्वर कोळी, निळकंठ कोळी, मानाची पालखी दिवाळे कोळीवाड्याची अध्यक्ष करेश मुंबईकर, श्री साईकला ब्रास बँड सर्कलचे अध्यक्ष अक्षय कोळी, मनीष बिजलानी, उपअभियंता चौरे, बेलापूर विभाग अधिकारी डॉ. अमोल पालवे व दिवाळे गावातील असंख्य नागरिक व महिला भगिनी उपस्थित होते.

## क्लिक...क्लिक...!



रोहे : सूर्य मावळत असताना कुंडलिका नदीतीरावरील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचे महादेव सरसंबे यांनी टिपलेले छायाचित्र.

# पावसाळा सुरू झाल्याने छत्र्या दुरूस्तीची लगबग

**पनवेल : वार्ताहर**

पावसाळा सुरू होताच जुन्या छत्र्यांची शोधाशोध सुरू होते. घरात ठेवलेल्या छत्र्यांचा मग शोध घेतला जातो नुकत्याच आलेल्या अचानक पावसाने नागरिकांक त्रेधातिरपीट उडाली. यावेळी नव्याने छत्री घेण्यापेक्षा जुनीच छत्री दुरुस्ती करून पुन्हा उपयोगात आणण्याकडे अनेकांचा कल होता यामुळे गेल्या काही दिवसांत पडलेल्या पावसामुळे छत्री दुरुस्ती कामगारांना सुगीचे दिवस आले आहेत.



छत्री दुरुस्ती करणाऱ्यांचे कौशल्य केवळ हातातले काम नसून, ती एक विशिष्ट कला आहे. विविध प्रकारच्या छत्र्यांची रचना, साहित्य, सांधे ओळखून त्या बारीक तंत्राने दुरुस्त करणं हे सहजसोपं नसतं. 'ही कामं करणं म्हणजे संयम आणि अनुभवाचं काम आहे. गेल्या काही वर्षांत बाजारात मिळणाऱ्या स्वस्त आणि आकर्षक छत्र्यांनी ग्राहकांना मोहात पाडले असले, तरी त्यांचा टिकाव फारसा नसतो. दोन-चार वापरात सुळे वाकतात, सांधे तुटतात. त्यामुळे जुनीच छत्री नव्याने वापरण्याकडे नागरिकांचा कल आहे. पावसाळा हा छत्री दुरुस्ती करणाऱ्यांसाठी केवळ ऋतू नसून, तो अर्थार्जनाचा एक महत्त्वाचा काळ आहे. मात्र, हा व्यवसाय वर्षभर सातत्याने चालावा व्यावसायिकांना प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांची आवश्यकता आहे.

# बालविवाह प्रतिबंधात्मक समुपदेशन

## खालापुरातील मिरकूटवाडीवर उपक्रम



**खालापूर : प्रतिनिधी**

समाजातील आदिवासी घटकांमध्ये बालवयात लग्न झाल्याने पुढील आयुष्यात होणारे नुकसान, सामुदायिक विवाह सोहळ्याचे महत्त्व व गुन्हेगारीला आळा घालणे यासाठी खालापूर तालुक्यातील मिरकूटवाडी येथे समुपदेशन कार्यक्रम झाला.

या वेळी सहज सेवा फाउंडेशनच्या महिला अध्यक्ष निलम पाटील यांनी बालवयात लग्न झाल्यास होणारे परिणाम विषद केले, तर अ‍ॅड. जयेश तावडे यांनी कायद्याच्या बाजू समजावून सांगितल्या. फाउंडेशनतर्फे दरवर्षी २ एप्रिल रोजी सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले जाते. यात भाग घेण्याचे आवाहनदेखील करण्यात आले. या वेळी मान्यवरांनी अ‍ॅड. तावडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या, तर मिरकूटवाडी येथे वाढदिवसानिमित्त छत्र्यांचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमास फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे, सचिव अखिलेश पाटील, खजिनदार संतोष गायकर, जयश्री कुळकर्णी, ऋतुजा तावडे, सतीश पाटील, पांडुरंग पाटील, सुधीर चौधरी, जयेश पालांडे, प्रशांत पाटील, रोहित नलावडे, शिवतेज तावडे, कुणाल पाटील, आयुष पाटील, ओमकार वाणी, ललित टेकले, ग्रामस्थ कृष्णकांत पाटील, शंकर वाघमारे, माजी सरपंच भगवान कातकरी, अंकुश वाघमारे उपस्थित होते. अभि ग्रुप, देवन्हावे यांचे सहकार्य लाभले.

# कल्याण येथून पळालेल्या आरोपीला रोहा पोलिसांनी पाठलाग करून पकडले



**धाटाव, रोहा : प्रतिनिधी**

कल्याण तालुका पोलीस ठाण्यात दाखल एका गुन्ह्यातील फरार आरोपी चैतन्य राजू शिंदे (वय २३, रा. रोहिदास नगर, रोहा) याला रोहा पोलिसांनी शिताफीने पाठलाग करून अष्टमी परिसरातून ताब्यात घेतले. या आरोपीने ४ जून रोजी न्यायालयीन कोठडी मंजूर झाल्यानंतर पोलिसांना झटका देत कल्याण रेल्वेस्थानकातून पळ काढला होता.

बकरी ईदनिमित्त रोहा पोलिसांना गस्तीदरम्यान गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार चैतन्य शिंदे रोहा रेल्वेस्थानक परिसरात असल्याचे कळाले. त्यानुसार पोलिसांनी तातडीने पथक तयार करून परिसराचा ताबा घेतला. पोलिसांची चाहूल लागताच आरोपीने पळण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलीस निरीक्षक पाटील, उपनिरीक्षक खातीब आणि कर्मचाऱ्यांच्या मदतीने पाठलाग करून अष्टमी शहर परिसरातून त्यास जेरबंद करण्यात आले.

या कारवाईत रोहा पोलीस ठाण्याचे हेड कॉन्स्टेबल पेडवी, शीरतार, कॉन्स्टेबल गुट्टे, पाटील, तडवी, कोटकर, बिजले, भोईर, साळुंखे तसेच मुख्यालयाकडील स्ट्रेकिंग फोर्स, एनव्हीआरएसएस टीम व अष्टमी भागातील ग्रामस्थांचाही मोलाचा सहभाग होता. विशेष म्हणजे, या कारवाईत विशेष निसर्ग वन्यजीव संवर्धन संस्थेनेही महत्त्वाची मदत केली.

# म्हसळ्यात बेपत्ता बैल अखेर सापडला

## ◆ शेतकऱ्याने मानले पोलिसांचे आभार



म्हसळा : प्रतिनिधी

म्हसळा तालुक्यातील खारगाव खुर्द सकलप येथील शेतकरी किसन उर्फ मंगेश म्हात्रे यांचा हरवलेला बैल अखेर सापडला आहे. त्यामुळे त्यांनी आनंद व्यक्त करून पोलिसांचे आभार मानले.

शेतावर नांगरणी, पेरणीसाठी सकाळी नेलेला बैल दुपारी पेऱ्यावरून सोडल्यानंतर तो तब्बल दोन दिवस घरी आला नाही. शेतकरी म्हात्रे यांनी शोधाशोध करूनदेखील बैल न सापडल्याने महादेव पाटील यांच्यासमवेत म्हसळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक संदीप कहाळे यांची भेट घेतली आणि नेहमी घरी येणारा बैल आला नाही याबाबत रितसर तक्रार दिली. पोलीस स्टाईलने कहाळे यांनी सकलप येथील बैल बेपत्ता नसून अन्य हेतूने चोरीला गेला आसल्याचे काही मंडळींच्या कानावर घालून काही वेळात बैलाने घरचा मार्ग धरला पाहिजे, असे कडक भाषेत सांगितले. त्यानंतर दोन तासांत बैल मार्गावर असल्याचा निरोप आला.

किसन म्हात्रे यांच्या कुटुंबियांनी गोवंशाचे ओवाळून स्वागत केले. शेजारी पाजारी पेढे वाटून पोलिसांनी उत्कृष्ट कामगिरी बजावल्याचा डंका गावात पिटला आणि सहाय्यक निरीक्षक संदीप कहाळे यांची भेट घेऊन आभार व्यक्त केले.

# मुरूडमधील विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते राष्ट्रवादीत



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूडचे माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर यांचे समर्थक, काँग्रेसचे माजी नगरसेवक विश्वास चव्हाण व विविध पदाधिकारी, कोळी समाजाचे नेते प्रकाश सरपाटील व त्यांचे समर्थक तसेच मुस्लिम समाजातील लोकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. या सर्वांचे राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी पक्षात स्वागत केले.

मुरूड येथील वसंतराव नाईक महाविद्यालयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमास व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे अलिबाग मुरूड विधानसभा अध्यक्ष अमित नाईक, मुरुड तालुका अध्यक्ष फैरोझ घलटे, रायगड जिल्हा सोशल मीडिया सेलचे उपाध्यक्ष हसमुख जैन, राष्ट्रवादीचे नेते मनोज भगत, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अजित कासार, सचिव विजय पैर, तालुका महिला अध्यक्ष अ‍ॅड. मृणाल खोत, माजी जिल्हा परिषद सदस्य नम्रता कासार, माजी सभापती स्मिता खेडेकर आदी उपस्थित होते.

या वेळी माजी शिक्षण सभापती नितीन पवार, मुरूड तालुका सुपारी संघाचे संचालक राजेंद्र पोतनीस, अ‍ॅड. दत्ता पाटील, अविनाश भगत, अमोल उपाध्ये, माजी सरपंच हाफीज्यू कबले, विजय भोय, निखिल पाडगे, माजी नगरसेवक प्रभाकर मसाल, माजी सरपंच कृष्णा म्हात्रे, विलास पाटील, शीघ्र परीट समाज, शिघरे मुस्लिम समाज; त्याचप्रमाणे काँग्रेसचे माजी नगरसेवक विश्वास चव्हाण, मुरुड शहर अध्यक्ष नाना गुरव, माजी रायगड जिल्हा महिला अध्यक्ष वरसंती उमरोटकर, अरुण गुरव, प्रगती म्हात्रे, भरत म्हात्रे, श्रीनिवास विरकुड, दीपक राजपूरकर, स्वप्नील म्हसळकर, सुमित दर्गे, अविनाश कोतवाल, अनिल दर्गे, संजय पेणकर, मंगेश बलकवडे, जावं रुजारिओ आदींनी राष्ट्रवादीत प्रवेश केला.

# क्रुझर आणि दुचाकीच्या अपघातात पाच जण जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

शिवराज्याभिषेक कार्यक्रमावरून येताना निजामपूर विभागातील शिरसाट गावच्या हद्दीत क्रूझर व मोटरसायकलचा अपघात होऊन पाच जण जखमी झाल्याची घटना घडली.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार चांगदेव हांडे (वय ४३, रा. लांबोटी, जि. सोलापूर) त्यांच्या ताब्यातील क्रुझर जीप (एमएच १३ एझेड ८१९६) घेऊन शिवराज्याभिषेकाचा कार्यक्रम आटोपून निजामपूर, ताम्हाणीमार्गे पुणे सोलापूर येथे जात होते. दुपारी १.३०च्या सुमारास शिरसाट गावच्या पुढे आल्यावर समोर चाललेल्या गाडीला ओव्हरटेक करीत असताना जीपने निजामपूर बाजूकडून येणाऱ्या मोटरसायकलला (एमएच १२ एक्सजे २४८१) ठोकर मारून अपघात केला. या अपघातामध्ये मोटरसायकलवरील किरण सुरेश मराठे, मायव संजय जळपटे या दोघांना दुखापती झाल्या असून जीपमधीलसुद्धा तीन जण जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहेत.



# ‘रिश्ते’ला पुरस्कार

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबईतील वरळी येथील नेहरू सेंटरमध्ये झालेल्या कार्यक्रमात दिनेश मोरे दिग्दर्शित रिश्ते या शॉर्टफिल्मला दादासाहेब फाळके पुरस्काराने गौरवण्यात आले.

या आधी रिश्ते शॉर्टफिल्मने १० चित्रपट महोत्सवात भाग घेतला असून एकूण ३० पारितोषिके मिळवली आहेत. विशेष म्हणजे या फिल्मला आतापर्यंत सर्वच विभागात पारितोषिके मिळाली आहेत. नुकतेच दादासाहेब फाळके फिल्म पुरस्कार ऑफ इंडिया २०२४–२५ या प्रतिष्ठित चित्रपट महोत्सवात गौरवण्यात आल्याने ‘रिश्ते’चे दिग्दर्शक दिनेश मोरे; लेखक, निर्माते आनंद रामकृष्णन तसेच संपूर्ण टीमवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. ही फिल्म २४ मे रोजी पॉकेटफिल्म्स या ओटीटी प्लॅटफॉर्मवर रिलीज झाली आहे.

# शिवस्वराज्य दिन उत्साहात साजरा

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींच्या वतीने शिवस्वराज्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ६ जून १६७४ रोजी रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा छत्रपती म्हणून राज्याभिषेक झाला. शिवरायांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त राज्य सरकारने ६ जून हा शिवस्वराज्य दिन म्हणून साजरा करण्याचे नक्की केले. त्याला अनुसरून चौक ग्रुप ग्रामपंचायत येथे सरपंच रितू ठोंबरे, लोधीवली सरपंच पूजा तवले, तुपगाव सरपंच रवी कुंभार, वावर्ले सरपंच प्रिया प्रफुल्ल विचारे, कलोते प्रशासक निलेश म्हसकर, वावंढळ सरपंच सुहास कदम, आसरे सरपंच बळीराम जांभळे, ग्रामपंचायत टेंभरी, बोरगाव सरपंच प्रविणा मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ, मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# जनता विद्यामंदिर प्रशालेत वृक्षारोपण



**कर्जत : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून दहिवली येथील जनता विद्यामंदिर प्रशालेच्या प्राथमिक विभाग व माध्यमिक विभागांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण करण्यात आले.

दरवर्षी पर्यावरण दिनानिमित्त शाळेत झाडे लावली जातात व त्यांचे संगोपन करण्यात येते. मुख्याध्यापक जवाहरलाल चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्व प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका शलाका घरत व प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका ज्योती दिसले, प्रताप गीते यांच्या हस्ते वृक्षारोपण समारंभाचा शुभारंभ करण्यात आला. शाळेतील विद्यार्थ्यांनीसुद्धा वृक्षारोपण करून त्यांच्या संगोपनाचा संकल्प केला.

या कार्यक्रमास अनंत शिंदे, संध्या खंडागळे, मनीषा गायकवाड, वर्षा कांबळे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# खालापुरात एक झाड आईच्या नावे उपक्रम




**चौक : प्रतिनिधी**

तुम्हाला मायेची ऊब हवी असेल तर मग आईच्या नावे प्रत्येक भारतीयाने एक झाड लावावे आणि त्याला जगवावे, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते. त्यास अनुसरून खालापूर तालुक्यातील विविध ग्रामपंचायतांनी वृक्ष लागवड केली.

पर्यावरणाचा होणारा ऱ्हास रोखण्यासाठी केंद्र शासनाने एक झाड आईच्या नावे संकल्पना राबविण्याचा निर्धार केला आहे. आईच्या नावाने लावलेले झाड भविष्यात मुलांना नक्कीच सुखाची सावली देईल यात दुमत नाही, असा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विश्वास आहे. या पार्श्वभूमीवर खालापूर तालुक्यातील ४५ ग्रामपंचायतींनी आपापल्या हद्दीत विविध प्रकारची औषधी, ऑक्सिजन देणारी, सावली आणि फळे देणारी झाडे लावून ती जगविण्याचा संकल्प केला.

काही ग्रामपंचायतींनी लावलेली झाडे दत्तक दिली असून त्याचे संगोपन केल्यास त्यांना विशेष सन्मान करण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे.

दरम्यान, सध्या माझी वसुंधरा अभियान अंतर्गत लावलेल्या झाडांची चांगल्या पद्धतीने वाढ झाली असून निसर्गाचा समतोल राखण्यासाठी गरजेचे आहे, असे मत व्यक्त करण्यात आले. उंबरे ग्रामपंचायत हद्दीत अधिकारी अविनाश पिंपळकर यांनी १००० झाडे लावण्याचा संकल्प केला आहे.

# रोहा एसटी डेपो परिसरात वृक्षारोपण

**माणगाव : बातमीदार**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त रोहा एसटी डेपो तसेच चर्च यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात विविध शासकीय विभाग व स्थानिक संघटनांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

उपक्रमास प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल, वनसंरक्षक डॉ. शैलेंद्र कुमार जाधव, तहसीलदार किशोर देशमुख, उपअभियंता वी.आर.बागुल, शाखा अभियंता ए.एम. पाटील, ज्युनिअर शाखा अभियंता एम.एम. घाडगे, वनपाल डी.बी. वाघे आदी उपस्थित होते. त्याचप्रमाणे रोहा आगार व्यवस्थापक प्रकाश शेलार, स्थानक प्रमुख अजिंक्य रोहेकर, आगार लेखापाल विकास खाडे, वरिष्ठ लिपिक प्रियांका चव्हाण, वाहतूक नियंत्रक हेमंत कदम, सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक स्वप्नील पवार, वाहतूक नियंत्रक नेथू गावित, छाया घोरपडे यांचीही उपस्थिती होती. डेपोचे कर्मचारी व उन्हाळी शिबिरातील लहान मुलांनीही आनंदाने सहभाग घेतला. स्नेहवर्धनी संस्थेचे पदाधिकारीही उपस्थित होते.



या वेळी एसटी डेपो परिसरात व आजूबाजूला अनेक रोपे लावण्यात आली. यंदाच्या जागतिक पर्यावरण दिनाचे घोषवाक्य आपली भूमी, आपले भविष्य या संकल्पनेवर आधारित होते, ज्यामध्ये भूमी पुनरूज्जीवन, वाळवंटीकरण आणि दुष्काळ प्रतिकारशक्ती यावर भर देण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात डेपो प्रशासनाने उपस्थित मान्यवरांना रोपे देऊन स्वागत करून केली. त्यानंतर लहान मुलांनी स्वागत केल. मग प्रमुख मान्यवर व मुलांच्या हस्ते विविध प्रकारच्या रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले.

या उपक्रमाचे उपस्थित अधिकारी व मान्यवरांनी कौतुक केले आणि अशा उपक्रमांमध्ये स्थानिक लोकसहभाग महत्त्वाचा असल्याचे सांगितले. रोहा चर्चचे प्रमुख फादर यांनी आभार मानले. कार्यक्रमाचा समारोप लहान मुलांना अल्पोपहार देऊन झाला.

# पहिल्या कसोटीसाठी टीम इंडियात चुरस




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड या दोन संघांमध्ये पाच कसोटी सामन्यांची मालिका रंगणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघ इंग्लंडमध्ये दाखल झाला आहे. दोन्ही संघांमध्ये होणाऱ्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना २० जूनपासून रंगणार आहे. हेडिंग्लेच्या मैदानावर होणाऱ्या पहिल्या सामन्यासाठी संघात स्थान मिळण्यासाठी टीम इंडियात चुरस आहे.

भारतीय संघाला गेल्या १८ वर्षांपासून इंग्लंडमध्ये कसोटी मालिका जिंकता आलेली नाही. त्यामुळे भारतीय संघासमोर इंग्लंडला हरवण्याचे मोठे आव्हान असणार आहे. मुख्य बाब म्हणजे इंग्लंड दौरा सुरू होण्यापूर्वीच विराट कोहली आणि रोहित शर्माने कसोटी क्रिकेटला रामराम करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे रोहितच्या जागी कर्णधारपदाची जबाबदारी युवा फलंदाज शुबमन गिलकडे सोपवण्यात आली आहे. गिलकडे नेतृत्वाचा फार अनुभव नाही. याशिवाय तो पहिल्यांदाच कसोटी संघाचे नेतृत्व करणार आहे. त्यामुळे त्याच्यासाठी इंग्लंडचा पेपर मुळीच सोपा नसेल.

इंग्लंडविरूद्ध होणाऱ्या पहिल्या सामन्यात सलामीला फलंदाजी करण्यासाठी यशस्वी जयस्वाल आणि केएल राहुलचा प्लेइंग ११मध्ये समावेश केला जाऊ शकतो, तर अनुभवी फलंदाज करूण नायरला तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करण्याची संधी मिळू शकते. कर्णधार शुबमन गिल चौथ्या क्रमांकावर आणि उपकर्णधार ऋषभ पंत पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला येऊ शकतो.

यासह अभिमन्यू ईश्वरन किंवा साई सुदर्शनपैकी एकाचा प्लेइंग ११ मध्ये समावेश केला जाऊ शकतो, तर अष्टपैलू रवींद्र जडेजाचादेखील प्लेइंग ११मध्ये समावेश केला जाऊ शकतो. वेगवान गोलंदाज म्हणून मोहम्मद सिराज, जसप्रीत बुमराह आणि प्रसिद्ध कृष्णा यांना संधी दिली जाऊ शकते. अष्टपैलू खेळाडू म्हणून नितीश कुमार रेड्डी आणि शार्दुल ठाकूरपैकी एकाचा प्लेइंग ११मध्ये समावेश केला जाऊ शकतो. त्यामुळे कुलदीप यादवला इतक्यात संधी मिळणे कठीण आहे.

## कर्जतमध्ये रंगली रायगड जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धा



**कर्जत : प्रतिनिधी**

सुधाकरभाऊ घारे फाउंडेशन पुरस्कृत रायगड जिल्हा मानांकन जिल्हा कॅरम स्पर्धा कर्जतमध्ये आयोजित करण्यात आली होती. या दोन दिवसीय स्पर्धेत जिल्ह्यातील १५२ खेळाडूंनी सहभाग घेतला.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसंपर्क कार्यालयातील सभागृहात झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन माजी सरपंच मधुकर घारे यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन समारंभास रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश तुळपुळे, खजिनदार वैभव पेठे, सहसचिव अभिजित तुळपुळे, प्रकाश पालकर, मनोहर पाटील, माजी नगरसेवक उमेश गायकवाड, सोमनाथ ठोंबरे, दीपक लाड, महेंद्र चंदन, शरद हजारे, केतन बेलोसे, अनिल मोरे, प्रशांत चंदन, कुमेश मोरे, प्रेम लाड आदी उपस्थित होते. स्पर्धा प्रमुख मिलिंद लाड यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

या वेळी बोलताना मधुकर घारे म्हणाले, तालुक्यात कॅरमचे उत्कृष्ट खेळाडू तयार करणे गरजेचे आहे. त्यांना चांगले प्रशिक्षण द्यायला हवे. या स्पर्धेला इतका चांगला प्रतिसाद मिळेल, असे वाटले नव्हते. उत्तम वातावरण या स्पर्धेच्या निमित्ताने तयार झाले आहे.

स्पर्धेचे प्रमुख पंच म्हणून आशिष बागकर, सहाय्यक पंच म्हणून राजन पांचाळ, दीपक सिनलकर, तर तांत्रिक अधिकारी म्हणून दीपक पांचाळ यांनी काम पाहिले.

## टीम इंडियाच्या स्टाफमध्ये नवा कोच दाखल

**लंडन : वृत्तसंस्था**

आयपीएलनंतर आता भारतीय संघ कसोटी मालिकेसाठी इंग्लंडमध्ये पोहचला आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या अनुपस्थितीत कर्णधार शुबमन गिलच्या नेतृत्त्वाखालील संघाने इंग्लंडमध्ये सरावाला सुरुवात केली असून बीसीसीआयने याचा व्हिडीओ शेअर केलाय. दरम्यान भारताच्या कोचिंग स्टाफमध्ये एका नव्या कोचची एन्ट्री झाली आहे.

भारतीय क्रिकेट संघ २० जूनपासून इंग्लंडविरुद्ध पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. सध्या भारतीय संघ लंडनमधील ट्रेनिंग सेंटरमध्ये आहे. टीम इंडियाने या कसोटी मालिकेसाठी सराव सुरू केला आहे आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याचा प्रयत्नही खेळाडू करत आहे.

बीसीसीआयने टीम इंडियाच्या प्रशिक्षणाचा व्हिडीओ शेअर केला आहे. यामध्ये खेळाडू सराव करताना दिसत आहेत. भारताचे नवे स्ट्रेंथ अँड कंडिशनिंग कोच एड्रियन ले रॉक्स हेही व्हिडीओमध्ये आहेत. त्यांनी भारतीय संघाचे पूर्वीचे कोच सोहम देसाई याची जागा घेतली आहे.



### कोण आहेत एड्रियन ले रॉक्स?

एड्रियन ले रॉक्स यांच्या इन्स्टग्राम बायोनुसार ते एक क्रीडा शास्त्रज्ञ आहेत आणि केपटाऊनचे आहेत. ले रॉक्सला सायकलिंग, ट्रायथलॉन सारख्या खेळांमध्ये रस आहे. ते अनेकदा या खेळांमध्ये भाग घेताना दिसतात. रॉक्स हे भारताचे पहिले स्ट्रेंथ आणि कंडिशनिंग प्रशिक्षक राहिले आहेत. त्यांनी जानेवारी २००२ ते मे २००३पर्यंत जबाबदारी सांभाळली होती.

एड्रियन ले रॉक्स यांनी सौरव गांगुलीच्या नेतृत्वाखालील तत्कालीन भारतीय संघात एक नवीन फिटनेस संस्कृती आणली. जून २००३मध्ये ते दक्षिण आफ्रिकेच्या संघाचे स्ट्रेंथ अँड कंडिशनिंग प्रशिक्षक बनले. ले रॉक्स ऑगस्ट २००७पर्यंत दक्षिण आफ्रिकेच्या संघाबरोबर होते. ते आयपीएलमध्ये पंजाब किंग्ज आणि कोलकाता नाईट रायडर्सचा भाग होते.

## कोको गॉफ टेनिसची नवी सम्राज्ञी

**पॅरिस** : अमेरिकेची युवा टेनिस तारका, जागतिक क्रमवारीतील द्वितीय मानांकित कोको गॉफने फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेच्या महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात बलाढ्य आर्यना सबालेंकाला पराभूत करत आपले पहिले फ्रेंच ओपन आणि एकूण दुसरे ग्रँड स्लॅम विजेतपद पटकावले. तब्बल २ तास ३८ मिनिटे चाललेल्या या संघर्षपूर्ण सामन्यात गॉफने सबालेंकावर ६-७, ६-२, ६-४ असा विजय मिळवला. या विजयासह तिने रोलँड गॅरोसच्या लाल मातीवर ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

## ‘डब्ल्यूटीसी’मध्ये इतिहास रचण्याची पॅट कमिन्सला सुवर्णसंधी

### ऑस्ट्रेलियाचा कर्णधार बुमराहचा विक्रम मोडण्यापासून पाच विकेट्स दूर

**लंडन : वृत्तसंस्था**

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या २०२३-२०२५च्या पर्वाचा अंतिम सामना ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात खेळला जाणार आहे. हा महामुकाबला ११ जूनपासून लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर रंगेल. या लढतीसाठी ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेच्या संघांची घोषणा झाली आहे. दरम्यान, कांगारूंचा कर्णधार पॅट कमिन्स अंतिम सामन्यात पाच विकेट घेताच भारतीय वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला मागे टाकेल.

२०२३-२५च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत सर्वाधिक विकेट्स घेण्याचा विक्रम जसप्रीत बुमराहच्या नावावर आहे. त्याने एकूण १५ सामन्यांमध्ये ७७ विकेट्स घेतल्या आहेत. या यादीत ऑस्ट्रेलियाचा पॅट कमिन्स दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्याने एकूण ७३ विकेट्स घेतल्या आहेत. आता जर त्याने द. आफ्रिकेविरुद्धच्या अंतिम सामन्यात पाच विकेट्स घेतल्या, तर तो बुमराहला मागे टाकून नंबर १ स्थान मिळवेल. यासह तो २०२३-२५च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज बनेल.

पॅट कमिन्स नेहमीच त्याच्या दमदार गोलंदाजीसाठी ओळखला जातो. त्याने स्वतःच्या बळावर अनेक सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलियन संघाला विजय मिळवून दिला आहे. त्याच्या नेतृत्वाखाली ऑस्ट्रेलियाने २०२३च्या डब्ल्यूटीसी फायनलमध्ये टीम इंडियाला मात देऊन विजेतेपद पटकावले.

### त्रिशतक पूर्ण करण्याचीही संधी

पॅट कमिन्सने २०११मध्ये ऑस्ट्रेलियासाठी कसोटी पदार्पण केले. तेव्हापासून त्याने ६७ कसोटी सामन्यांमध्ये एकूण २९४ बळी घेतले आहेत. आता त्याने द. आफ्रिकेविरुद्धच्या अंतिम सामन्यात सहा बळी घेतले, तर तो कसोटी क्रिकेटमध्ये ३०० बळी पूर्ण करेल. कसोटींव्यतिरिक्त त्याने आतापर्यंत एकदिवसीय क्रिकेटमध्ये १४३ व टी-२०मध्ये ६६ बळी टिपले आहेत.

## रिंकू सिंह आणि प्रिया सरोज यांचा साखरपुडा



**लखनऊ : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेटमध्ये फिनिशरच्या रुपात आपली खास छाप सोडणारा रिंकू सिंह आणि समाजवादी पक्षाच्या खासदार प्रिया सरोज या जोडीने साखरपुडा उरकून घेतला आहे. लखनऊ येथील द सेंट्रम हॉटेलमध्ये रविवारी (दि. ८) मोजक्या आणि प्रतिष्ठित मंडळींच्या साक्षीने हा कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमाला दोन्ही कुटुंबातील मंडळींसह क्रिकेट आणि राजकीय क्षेत्रातील दिग्गजांनी उपस्थिती लावली होती. रिंकू आणि प्रिया यांच्या साखरपुड्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.


















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com